RNI : MAHMAR/2022/88796
www.vidarbhkesari.com  Vidabh Kesari News  90969 45629  @vidarbhkesari
vidarbhkesari21@gmail.com

दैनिक
# विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू
मुख्य संपादक : अमोल कंटाळे
www.vidarbhkesari.com

अमरावती
१७ शुक्रवार जूलै २०२६
✻ वर्ष ६ ✻ अंक ८५
✻ पृष्ठ : ६ ✻ मूल्य रु : ३

### आदित्य ठाकरेंचे थेट पंतप्रधान मोदींना पत्र

■ पेट्रोलमधील इथेनॉलच्या वाढत्या मिश्रणामुळे वाहनांचे मायलेज कमी होत असल्याच्या तक्रारींवरून संपूर्ण देशभरात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. युट्यूबर्स, सोशल मीडियावरील मिम्स आणि नेटीझन्सकडून केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांना टार्गेट केले जात असताना, आता या वादात राजकीय ठिणगी पडली आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते तथा आमदार आदित्य ठाकरे यांनी या प्रकरणी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहिले आहे. अनिवार्य इथेनॉल-मिश्रित इंधनामुळे लाखो भारतीयांचे नुकसान होत असून, ग्राहकांना '१०० टक्के शुद्ध पेट्रोल' आणि 'इथेनॉलमिश्रित पेट्रोल' असा पर्याय उपलब्ध करून देण्याची मागणी त्यांनी या पत्राद्वारे केली आहे.

# विद्यार्थ्यांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

**▸विदर्भ केसरी। नांदेड :**

एमपीएससीच्या परीक्षा ऑनलाइनऐवजी ऑफलाइन पद्धतीने घेण्यात याव्यात, या प्रमुख मागणीसाठी नांदेडमध्ये विद्यार्थ्यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढला. विद्यार्थी कृती समितीच्या नेतृत्वाखाली काढण्यात आलेल्या या मोर्चात मोठ्या संख्येने स्पर्धा परीक्षा देणारे विद्यार्थी सहभागी झाले होते. विद्यार्थीविरोधी शिक्षण धोरणात तातडीने बदल करून परीक्षा पारदर्शक आणि न्याय्य पद्धतीने घेण्याची मागणी आंदोलकांनी केली.

नांदेड शहरातील नवीन मोंढा येथून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत हा मोर्चा काढण्यात आला. यावेळी आंदोलक विद्यार्थ्यांनी घोषणाबाजी करत आपल्या विविध मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधले. एमपीएससीच्या सर्व परीक्षा ऑफलाइन पद्धतीने घेण्यात याव्यात, रिक्त असलेल्या स्टेनो पदांची तातडीने भरती करण्यात यावी, तसेच विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने शिक्षण आणि भरती प्रक्रियेत आवश्यक सुधारणा कराव्यात, अशा प्रमुख मागण्या यावेळी करण्यात आल्या. मोर्चानंतर विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिका-यांना निवेदन सादर करून शासनाने विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा अशी अपेक्षा व्यक्त केली. या आंदोलनात मोठ्या संख्येने विद्यार्थी सहभागी झाल्याने परिसरात काही काळ उत्साही वातावरण निर्माण झाले.

### ऑनलाइन परीक्षेचा निर्णय लांबणीवर

■ विविध विद्यार्थी संघटनांकडून सातत्याने होत असलेल्या मागण्यांची राज्य सरकारने गंभीर दखल घेतली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) परीक्षा पद्धतीत होणाऱ्या बदलांबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मुंबईत एक महत्त्वाची बैठक घेतली. या बैठकीत विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करत, एमपीएससीची संगणकआधारित (ऑनलाईन) परीक्षा पद्धत लगेचच लागू न करता, ती ऑगस्ट २०२७ पासून अंमलात आणण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. तोपर्यंत सर्व परीक्षा या सध्याच्या प्रचलित (ऑफलाईन) पद्धतीनेच घेतल्या जाणार आहेत. या महत्त्वपूर्ण बैठकीला एमपीएससीचे अध्यक्ष विवेक भीमनवार, राज्याचे मुख्य सचिव आणि सामान्य प्रशासन विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बैठकीत बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी परीक्षा प्रक्रियेबाबत सरकारची भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, "राज्यात एक सुरक्षित आणि पारदर्शी निवड प्रक्रिया असावी, हा कायमच माझा आग्रह राहिला आहे. त्यादृष्टीने परीक्षापद्धती सुद्धा पूर्णपणे पारदर्शीच असली पाहिजे. विद्यार्थ्यांच्या परीक्षा वेळेत झाल्या पाहिजेत आणि त्याचे निकाल सुद्धा वेळेतच लागले पाहिजेत, यावर आपला भर आहे."




## मालकाची हत्या करून मृतदेहासह ट्रक जाळला

**▸विदर्भ केसरी। मोर्शी,**

नजीकच्या चिखलसावंगी येथील प्रवासी निवाऱ्याजवळ एक जळत असलेला ट्रक आढळला. आग विझविल्यानंतर त्यात चालकाचाही जळालेला मृतदेह आढळून आला. यावरून चालकाची हत्या करून मृतदेह ट्रकसह जाळण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. घटनेबाबत मिळालेल्या माहितीनुसार, मोर्शी पोलिस स्टेशनच्या हद्दीतील चिखलसावंगी येथील प्रवासी निवाऱ्याजवळ बुधवारी, १५ जुलैला रात्री अकरा वाजताच्या सुमारास उभा असलेल्या एका ट्रकची केबिन जळत असल्याची माहिती ११२ क्रमांकावर मोर्शी पोलिसांना मिळाली होती. मोर्शी पोलिसांनी घटनास्थळावर जाऊन अग्निशामक विभागाच्या गाडीच्या मदतीने ट्रकची आग विझविली. मात्र, गुरुवारी सकाळी त्या ट्रकमधून दुर्गंध येत असल्यामुळे पुन्हा मोर्शी पोलिसांना माहिती देण्यात आली. जळालेल्या ट्रकची पोलिसांनी पाहणी केली असता ट्रकच्या केबिनच्या आत पूर्णपणे जळालेला मृतदेह आढळून आला. याबाबतची माहिती चंद्रपूर येथील ट्रक मालकाला पोलिसांनी बुधवारी रात्रीच दिली होती. वृत्तलिहीपर्यंत पोलिसात तक्रार दाखल करण्याचे काम सुरू होते. अधिक तपास मोर्शी पोलिस करीत आहे.

ट्रक मालकाचे नातेवाईक गुरुवारी सकाळी मोर्शी येथे पोहोचले असता त्यांना पुढील सर्व प्रकार पोलिसांनी सांगितला. ट्रकमालक उमेश गौरीशंकर मिश्रा १ जुलैला नागपूर येथून काही माल घेऊन गुजरातला गेले होते. सदर माल गुजरात येथे खाली केल्यानंतर तेथून नागपूरसाठी भाडे लागले असल्याची माहिती नातेवाईकांनी पोलिसांना दिली.

# NEET-UG 2026 चा निकाल जाहीर, 11.21 लाख विद्यार्थी उत्तीर्ण

**▸विदर्भ केसरी।**

नॅशनल टेस्टिंग एजन्सी (NTA) ने गुरुवारी NEET-UG 2026 चा निकाल जाहीर केला आहे. या वर्षी देश-विदेशातील 551 शहरांमधील 5,440 परीक्षा केंद्रांवर सुमारे 20 लाख विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. यापैकी 11.21 लाख विद्यार्थी वैद्यकीय, दंतवैद्यकीय, आयुष आणि इतर पदवीधर वैद्यकीय अभ्यासक्रमांसाठी पात्र ठरले आहेत.



यशस्वी उमेदवारांमध्ये 58% पेक्षा जास्त विद्यार्थिनी आहेत. 8 राज्यांमधील 17 राज्य टॉपर्सनी 700 किंवा त्याहून अधिक गुण मिळवले आहेत. तर, उत्तर प्रदेशमधून सर्वाधिक 1.7 लाखांहून अधिक उमेदवार यशस्वी झाले, तर लक्षद्वीपमधून सर्वात कमी 43 उमेदवार पात्र ठरू शकले.

या वर्षी 138 उमेदवारांनी 720 पैकी 690 पेक्षा जास्त गुण मिळवले. यापैकी 93% पेक्षा जास्त उमेदवार पहिल्यांदाच परीक्षा देणारे होते, तर 99% टॉप रँकर्सचे वय 17 ते 19 वर्षांच्या दरम्यान आहे. नीट परीक्षा 13 भाषांमध्ये आयोजित करण्यात आली होती आणि देशातील सर्व 36 राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील उमेदवार यात सहभागी झाले होते.

- ■ 138 उमेदवारांनी 720 पैकी 690 पेक्षा जास्त गुण मिळवले.
- ■ यापैकी 93% पेक्षा जास्त उमेदवार पहिल्यांदाच NEET मध्ये सहभागी झाले होते.
- ■ 99% टॉप रँकर्सचे वय 17 ते 19 वर्षांच्या दरम्यान आहे.
- ■ 17 राज्यांमधील स्टेट टॉपर्सनी 700 किंवा त्याहून अधिक गुण मिळवले.
- ■ 26 राज्यांमधील स्टेट टॉपर्सनी 690 पेक्षा जास्त गुण मिळवले.
- ■ 138 टॉप रँकर्स देशातील 66 शहरांमधून आहेत.
- ■ 705 पेक्षा जास्त गुण मिळवणारे टॉप-17 उमेदवार आठ राज्यांमधून आहेत—पंजाब, हरियाणा, राजस्थान, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, बिहार, तामिळनाडू आणि तेलंगणा.

### पेपरफुटीमुळे फेरपरीक्षा झाली

■ नीट-यूजी २०२६ परीक्षा २१ जून रोजी दुपारी २:०० ते सायंकाळी ५:०० या वेळेत ऑफलाइन (पेन-पेपर) पद्धतीने घेण्यात आली. ही परीक्षा १३ भाषांमध्ये घेण्यात आली आणि यात सर्व ३६ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमधील, तसेच परदेशातील विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. यावर्षी, ही परीक्षा भारत आणि परदेशातील ५५१ शहरांमधील ५,४४० परीक्षा केंद्रांवर घेण्यात आली. पेपरफुटीच्या घटनेनंतर, सरकारने नीट परीक्षेत मोठे बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. २०२७ पासून, नीट-यूजी परीक्षा संगणक-आधारित चाचणी (CBT), म्हणजेच ऑनलाइन पद्धतीने घेतली जाईल. सध्या ही परीक्षा ऑफलाइन (पेन-आणि-पेपर) पद्धतीने घेतली जाते. नवीन पद्धतीत, विद्यार्थी संगणकावर प्रश्न सोडवतील. तथापि, अभ्यासक्रम, प्रश्नांची संख्या, विषय आणि गुणदान पद्धतीत कोणताही बदल होणार नाही.

# एका रात्री दोन घरांवर दरोडे

**▸विदर्भ केसरी। सेलू,**

सेलू शहरात बुधवारी मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी एका रात्रीत दोन घरांवर धाडसी दरोडे टाकले. यात १ लाख ९२ हजाराची रोकड व सोन्या चांदीचे दागिणे लंपास केले. या घटनेची सेलू पोलिसात तक्रार दाखल करण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, मेहेरबाबा मंदिर परिसरातील रहिवासी विनोद जगदाळे यांच्या घरी कोणी नसताना अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घराचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला. घरातील सर्व खोल्यांतील कपाटे व साहित्य अस्ताव्यस्त फेकून दिले. सकाळी भाडेकरूच्या निदर्शनास तुटलेले कुलूप आल्यानंतर त्यांनी घरमालक व पोलिसांना माहिती दिली. या घरातून नेमका किती ऐवज चोरीस गेला, याची माहिती अद्याप कळू शकली नाही. याच रात्री शहरातील



गजानन फटिंग यांच्या घरावरही चोरट्यांनी हात साफ केला. येथे १ लाख ९२ हजारांची रोकड तसेच सुमारे ९ ग्रॅम वजनाची सोन्याची नथ चोरट्यांनी लंपास केल्याची माहिती समोर आली आहे.

पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवली असून फॉरेन्सिक पथक आणि श्वान पथक घटनास्थळी दाखल होऊन पुरावे संकलित केले. अज्ञात चोरट्यांचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून विविध पथके कार्यरत आहेत. एका रात्रीत सलग दोन घरांवर दरोडे पडल्याने सेलू शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शहरात रात्रीची पोलीस गस्त वाढवावी, चोरट्यांचा तातडीने बंदोबस्त करावा आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

# शेजारच्या शेतातील मजूरच निघाला नराधम!

## 12 वर्षांच्या मुलीची हत्या, आरोपीस अटक, गावात तणावपूर्ण शांतता; मोठा पोलीस बंदोबस्त

**▸विदर्भ केसरी। वर्धा,**

पाशवी अत्याचार करून तिचा दगडाने ठेचून खून केल्याची घटना बुधवारी सावंगी पोलिस ठाण्यांतर्गत येणाऱ्या रोठा शिवारात घडली. या घटनेने जिल्ह्यात संतापाचे वातावरण असून नागरिकांमध्ये मोठा आक्रोश आहे.




दरम्यान, पोलिसांनी ताबडतोब कारवाई करीत संशयित तिघांना ताब्यात घेऊन चौकशी सुरू केली. तसेच आरोपीला पकडण्यासाठी १४ पथकं तयार करण्यात आली असून तांत्रिक माहितीसाठी यातीलच दोन वेगळ्या पथकाची नियुती करण्यात आली होती. मात्र, संशयित म्हणून ताब्यात घेतलेल्या तिघांपैकी राहुल मडावी (३०) रा. रोठा हा मजूरच नराधम निघाल्याची माहिती पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल यांनी सायंकाळी पत्रकारांशी बोलताना दिली.

रोठा शिवारात बुधवारी १२ वर्षांच्या मुलीवर अत्याचार करून तिचा दगडाने ठेचून खून करण्यात आल्याची धकादायक घटना घडली. सावंगी पोलिसांनी तात्काळ घटनास्थळ गाठले. गुन्हा नोंद करून गुन्ह्याचा तपास शहर पोलिस ठाण्याचे उपविभागीय पोलिस अधिकारी सुनील महाडीक यांच्याकडे देण्यात आला. फॉरेन्सिक टिम, सायबर आणि श्वान पथकाने घटनास्थळाची माहिती घेऊन आवश्यक ते सॅम्पल गोळा केले. स्थानिक पोलिस, गुन्हे शाखेचे पथक आणि विभागातील जवळपास १४ पथकं तयार करण्यात आली होती. घटनास्थळाजवळ किती मोबाईल ट्रेस होतात, यासाठी तांत्रिक माहिती मिळवण्यासाठी वेगळे दोन पथकं तयार करण्यात आले होते. पोलिसांना काही माहिती मिळाली असून यावर काम सुरू होते. या माहितीच्या आधारे कसून चौकशी सुरू होती. या प्रकरणात उपविभागीय पोलिस अधिकारी सुनील महाडीक यांच्या नेतृत्वात एसआयटी तयार करण्यात आली. त्यांच्यासोबत विशेष १० लोकांची चमू देण्यात आली होती. अशातच पोलिसांनी तीन संशयितांना ताब्यात घेऊन चौकशी सुरू केली. दरम्यान, पोलिस खाया दाखविताच संशयित म्हणून ताब्यात घेतलेल्या तिघांपैकी राहुल मडावी पोपटासारखा बोलू लागला. गुन्ह्याची कबुलीही त्याने दिली.

पीडित मुलीचे कुटुंबीय ज्या शेतात सालगडी म्हणून काम करीत होते त्याच शेताच्या बाजूच्या एका शेतात नराधम राहुल मडावी हा मजूर म्हणून काम करीत होता. त्यामुळे त्याचे नेहमीच पीडित कुटुंबाच्या झोपडीत येणे-जाणे असायचे.

बुधवारी सुद्धा तो पीडित कुटुंबाच्या झोपडीत गेला असता मुलगी एकटी असल्याचे पाहून त्याने हा प्रकार घडवून आणल्याचे पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल यांनी सांगितले. सध्या त्याच्यावर पोसोसह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करून अटक केली आहे. लवकरच त्याला कोर्टात हजर करून पोलिस कोठडीची मागणी करू. मृत मुलीचा शवविच्छेदन अहवाल आणि आरोपीचा मेडिकल रिपोर्ट आल्यानंतरच हे प्रकरण स्पष्ट होणार असल्याचेही अग्रवाल यांनी सांगितले.



अग्रलेख

# 'ते' उपोषण!

नीट पेपरफुटी प्रकरण तसेच केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी सामाजिक आणि पर्यावरण कार्यकर्ते सोनम वांगचुक हे १८ दिवसांपासून दिल्लीतील जंतरमंतरवर उपोषणाला बसले आहेत. या प्रकरणाची आता दिल्ली उच्च न्यायालयाने दखल घेतली आहे. या संदर्भात याचिका दाखल करण्यात आली असून त्यांना तात्काळ वैद्यकीय सुविधा आणि उपचार देण्याची मागणी करण्यात आली आहे. याबाबत न्या. देवेंद्रकुमार उपाध्याय आणि न्या. तेजस करिया यांच्या खंडपीठाने केंद्र तसेच दिल्ली सरकारकडून गुरुवारी (१६ जुलै) सकाळपर्यंत उत्तर मागितले आहे. बार असोसिएशनच्या बहिष्कारामुळे सरकारकडून कोणताही वकील उपस्थित नसल्याने सुनावणी उद्या होणार आहे. याचिकाकर्ते राकेशकुमार सैनी यांनी व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सांगितले की, उपोषणामुळे वांगचुक यांची प्रकृती खालावत आहे. न्यायालयाने तातडीने सुनावणी करावी. नीट पेपरफुटी आणि परीक्षांमधील गैरव्यवहार प्रकरणी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी वांगचुक २८ जूनपासून उपोषण करत आहेत. सामाजिक कार्यकर्ते आणि वकील राकेशकुमार सैनी यांच्या याचिकेत सरकारने वांगचुक यांना तातडीने आपत्कालीन उपचार, जीवनरक्षक उपचार आणि आवश्यक पोषण उपलब्ध करून द्यावे. त्याचबरोबर त्यांच्या आंदोलनाशी संबंधित मुद्द्यांवर चर्चा सुरू करावी अशी मागणी करण्यात आली आहे. उपोषणामुळे वांगचुक यांचे सुमारे सव्वा आठ किलो वजन कमी झाले आहे. त्यांना कमी रक्तशर्करा, चक्कर येणे, जास्त अशक्तपणा आणि स्नायू कमकुवत होण्यासारख्या समस्या येत असल्याचे सांगण्यात येते. एखाद्याचा जीव धोक्यात असताना सरकार गप्प बसू शकत नाही. उपोषणाचा अधिकार शांततापूर्ण विरोधाचा भाग आहे. पण नागरिकाचा जीव वाचवणे ही सरकारची जबाबदारी आहे. वांगचुक यांच्या ढासळत्या प्रकृतीमुळे देशात चिंतेचे वातावरण आहे. चित्रपटसृष्टीतील कलाकारांनीही या आंदोलनाला आपला पाठिंबा दर्शवला आहे. ज्येष्ठ अभिनेते आणि सामाजिक कार्यकर्ते सयाजी शिंदे यांनी या गंभीर विषयावर सरकारला खडे बोल सुनावले आहेत. 'थ्री इडियट्स' चित्रपटातील लोकप्रिय 'रॅन्चो' हे पात्र सोनम वांगचुक यांच्याच ख-या आयुष्यावरून प्रेरित आहे, ही आठवण करून देताना शिंदे यांनी सरकारला सवाल केला आहे. ते म्हणाले, तुम्हाला मंत्रिपद टिकवायचे असेल तर नक्की टिकवा, पण वांगचुक यांचा जीव तरी वाचवा. चित्रपटातील रॅन्चोवर तुम्ही भरभरून प्रेम केले, मग ख-या आयुष्यातील या रॅन्चोकडे सरकार दुर्लक्ष का करत आहे? सयाजी शिंदे यांनी वांगचुक यांना प्रकृतीची काळजी घेण्यासाठी उपोषण मागे घेण्याची भावनिक विनंती केली. वांगचुक हे देशाची संपत्ती आहेत आणि त्यांना सुरक्षित ठेवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे असे शिंदे म्हणाले. सोनम यांच्यासोबत अनेक विद्यार्थी या आंदोलनात सहभागी झाले आहेत. ज्येष्ठ अभिनेत्री शबाना आझमी यांनी वांगचुक यांना उपोषण संपवण्याचे भावनिक आवाहन करताना म्हटले की, देशाला तुमच्यासारख्या व्यक्तीची नितांत गरज आहे. तुम्ही अन्यायाविरुद्ध आणि सत्यासाठी उभे राहता याचा आम्हाला अभिमान आहे. तुमचे मार्गदर्शन देशभरातील विद्यार्थ्यांना प्रेरणा देते. त्यासाठी तुम्ही निरोगी राहणे महत्त्वाचे आहे. वांगचुक यांच्या समर्थनार्थ झीनत अमान, अभय देओल, नसिरूद्दीन शाह, रत्ना पाठक शाह, ओमी वैद्य आणि रुबिना दिलैक यांनीही उपोषण मागे घेण्याची आणि सरकारने संवाद सुरू करावा अशी मागणी केली आहे. लोकशाही म्हणजे केवळ निवडणुका नव्हेत. लोकशाही म्हणजे विरोधी मत ऐकण्याची तयारी, जनभावनांचा आदर आणि सत्तेपेक्षा समाजाला प्राधान्य देण्याची संस्कृती. कोणत्याही लोकशाहीची खरी ताकद तिच्या विरोधकांशी ती कशी वागते यावर ठरत असते. सामाजिक कार्यकर्ते, शिक्षणतज्ज्ञ आणि रॅमन मॅगसेसे पुरस्कार विजेते सोनम वांगचुक अनेक दिवसांपासून जंतरमंतरवर उपोषण करत आहेत. त्यांच्या मागण्या मान्य कराव्यात की नाही, त्यांच्याशी सहमत व्हावे की मतभेद असावेत हा वेगळा विषय आहे. पण एका राष्ट्रीय पातळीवरील व्यक्तीने लोकशाहीच्या चौकटीत शांततापूर्ण आंदोलनाचा मार्ग स्वीकारला असताना केंद्र सरकारने त्याची दखलही घेऊ नये, ही गोष्ट सरकारची असंवेदनशीलताच दर्शवते. सरकारने आंदोलकांच्या सर्वच मागण्या मान्य कराव्यात असे नाही, पण सरकारने संवाद साधणे गरजेचे होते. देशभरातील लाखो विद्यार्थी स्पर्धा परीक्षांमधील गैरव्यवहार, पेपरफुटी, परीक्षा व्यवस्थेतील त्रुटी आणि पारदर्शकतेच्या प्रश्नांमुळे अस्वस्थ आहेत. या पार्श्वभूमीवर सोनम वांगचुक यांनी उपोषणाचा मार्ग स्वीकारला आहे. अशावेळी सरकारने मौन धारण करणे म्हणजे प्रश्न अस्तित्वातच नाहीत, अशी भूमिका घेण्यासारखे आहे. भारतीय लोकशाहीच्या इतिहासात उपोषण ही नैतिक दबावाची प्रभावी परंपरा राहिली आहे. महात्मा गांधींपासून ते अण्णा हजारेंपर्यंत अनेकांनी उपोषणाच्या माध्यमातून सत्ताधा-यांचे लक्ष वेधले. विशेष म्हणजे त्या काळातील सरकारांवर कितीही टीका झाली असली तरी संवादाची दारे कधी पूर्णपणे बंद झाली नव्हती. २०११ मध्ये अण्णा हजारेंच्या जनलोकपाल आंदोलनाच्या वेळी देशभरातून प्रचंड जनसमर्थन मिळाले होते. संसदेत विरोधी पक्षांनी तत्कालीन सरकारवर तीव्र टीका केली होती, तरीही सरकारने संवादाचा मार्ग निवडला होता. तत्कालीन केंद्रीय मंत्री विलासराव देशमुख यांनी समन्वयाच्या भूमिकेत विरोधी पक्षातील नेत्यांशी चर्चा केली, पंतप्रधानांशी संपर्क ठेवला, अखेर संसदेत ठराव मंजूर होऊन आंदोलनाची सांगता झाली होती. त्यावेळीही मतभेद होते, संघर्ष होता पण संवाद देखील होता. आज परिस्थिती वेगळी दिसते. विरोधी मत मांडणा-यांना देशविरोधी, राजकीय प्रेरित किंवा प्रसिद्धीच्या हव्यासापोटी आंदोलन करणारे ठरवण्याची सोपी पद्धत स्वीकारली जात आहे. त्यामुळे संवादाऐवजी संशय निर्माण होत आहे. लोकशाहीत सरकारचे काम विरोधकांचा अपमान करणे नसून त्यांचे म्हणणे ऐकणे असते. विरोधी मत हे लोकशाहीचे शत्रू नसते, ते तिचे सुरक्षा कवच असते, ही बाब सरकारला कोण सांगणार? मोदी सरकारने सत्तेत येण्यापूर्वी भ्रष्टाचाराविरोधात आणि पारदर्शक प्रशासनासाठी मोठी जनआंदोलने उभी केली होती. कदाचित आज त्यांना या गोष्टींचा विसर पडला असेल. त्यामुळे आज असा प्रश्न उद्भवतो की, आंदोलनात असताना जे लोकशाहीचे तत्त्वज्ञान योग्य वाटत होते, तेच तत्त्वज्ञान सत्तेत आल्यानंतर चुकीचे कसे काय वाटते? एखाद्या आंदोलनाकडे दुर्लक्ष केले म्हणजे ते संपत नाही, उलट दुर्लक्षामुळे जनतेच्या मनात असंतोष वाढतो हे सरकारने लक्षात घ्यायला हवे. त्यासाठी गरज आहे ती राजकीय अहंकार बाजूला ठेवण्याची!

# सोनम वांगचुक यांचे प्राण वाचवा

## ॲड. शिवाजीराव मोघे, दशरथ मडावी यांची पत्रकार परिषदेतून हाक



**विदर्भ केसरी। यवतमाळ :**

पेपर लीकमुळे देशभरातील 22 लाख विद्यार्थ्यांना मानसिक तसेच शारीरिक त्रास सहन करावा लागला. यादरम्यान काही विद्यार्थ्यांनी आत्महत्या सुद्धा केल्या. या गैर प्रकाराला कारणीभूत असलेल्या केंद्रीय शिक्षण मंत्री यांनी राजीनामा देण्याच्या मागणीसाठी दिल्ली येथे सोनम वांगचुक यांनी आमरण उपोषण सुरू केले आहे. या उपोषणाला आज 19 दिवस पूर्ण झाले असताना तसेच त्यांच्या जीवाला धोका असतानाही केंद्र सरकार कुठलीच कारवाई करायला तयार नसल्याने हे सरकार असवेदनशील तसेच निर्दयी असल्याची टीका काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री शिवाजीराव मोघे यांनी केली आहे. ते यवतमाळ येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते.

सोनम वांगचुक हे जगभरात प्रसिद्ध असे समाजसेवक तसेच शिक्षण तज्ञ आहेत. भारतात घडलेल्या पेपर लीक प्रकरणात जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षण मंत्र्यांनी राजीनामा देण्याची मागणी त्यांनी केली आहे. आज त्यांची प्रकृती अत्यंत गंभीर झाली असताना केंद्रातील मोदी सरकार मात्र लक्ष द्यायला तयार नाही. देशभरातील सर्वच पक्षाच्या नेत्यांनी या घटनेचा निषेध करीत वांगचुक यांचे उपोषण सोडवण्याची मागणी केली आहे. मोदी सरकार मात्र लक्ष द्यायला तयार नाही. सन 1984 मध्ये वांगचुक यांच्या वडिलांनी लदाख मध्ये उपोषण केले होते. यावेळी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी स्वतः लदाख मध्ये जाऊन त्यांचे उपोषण सोडविले होते. ही माहिती सांगत शिवाजीराव मोघे यांनी केंद्रातील मोदी सरकार निर्दयी असल्याचा आरोप केला. बिरसा क्रांती दलाचे संस्थापक अध्यक्ष दशरथ मडावी यांनी या घटनेचा निषेध करीत सोनम वांगचुक यांचे उपोषण राहुल गांधी यांनी पुढाकार घेऊन सोडवावे असे आवाहन केले.

# बाबुभाऊ देशमुख यांच्या पाठपुराव्याला यश

## कुरूम पशु वैद्यकीय दवाखान्यात डॉ. मनोज आडे रुजू!. आमदार हरिशभाऊ पिंपळे यांच्या सूचनेनंतर तातडीने झाली नियुक्ती



**विदर्भ केसरी। मूर्तिजापूर**

स्थानिक पशु वैद्यकीय दवाखान्यातील रिक्त पदांमुळे परिसरातील पशुपालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. या पार्श्वभूमीवर, भाजपचे जिल्हा सचिव बाबुभाऊ देशमुख यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर मोठे यश आले आहे. मूर्तिजापूर मतदारसंघाचे आमदार हरिशभाऊ पिंपळे यांच्या सूचनेवरून कुरूम येथील पशु वैद्यकीय दवाखान्यात अमरावती येथील डॉ. मनोज आडे यांची नियुक्ती करण्यात आली असून, ते दि. १५ जुलै २०२६ रोजी अधिकृतपणे रुजू झाले आहेत. डॉ. आडे यांच्या नियुक्तीसोबतच, मूर्तिजापूर पंचायत समिती येथे बदली झालेले परिचर . ढगे यांची देखील पुन्हा कुरूम येथे पुनर्नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे दवाखान्याचा कारभार आता पूर्ण क्षमतेने सुरू होणार आहे.

### डॉक्टरांचा सत्कार व आमदारांचे आभार

- नवनियुक्त डॉ. मनोज आडे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर, भाजप जिल्हा सचिव बाबुभाऊ देशमुख व कुरूम परिसरातील प्रमुख पशुपालकांच्या वतीने त्यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन जाहीर सत्कार करण्यात आला.
- कुरूम आणि परिसरातील पशुपालकांची अडचण लक्षात घेऊन आमदार हरिशभाऊ पिंपळे यांनी तातडीने या विषयाची दखल घेतली. डॉ. आडे आणि परिचर ढगे यांच्या नियुक्तीमुळे आता शेतकऱ्यांना आणि पशुपालकांना वेळेवर वैद्यकीय सेवा मिळणे शक्य होईल."
  > बाबुभाऊ देशमुख जिल्हा सचिव, भाजपा
- यावेळी उपस्थित सर्व पशुपालकांनी व ग्रामस्थांनी तत्परतेने निर्णय घेतल्याबद्दल कर्तव्यदक्ष आमदार हरिशभाऊ पिंपळे आणि पाठपुरावा करणारे बाबुभाऊ देशमुख यांचे मनापासून आभार मानले आहेत. या नियुक्तीमुळे कुरूम परिसरातील शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

# मतदार यादी अचुक, दोषमुक्त, पारदर्शक करण्यासाठी सर्वांनी पुढे यावे ;बळवंत अरखराव

**विदर्भ केसरी। परतवाडा ताः**



मतदार यादी अचूक, अद्यावत, पारदर्शक आणि दोषमुक्त करण्याच्या उद्देशाने 042 अचलपूर विधान सभा मतदार संघात विषेश सखोल पुनरीक्षण 2026 (एसआय आर ) अभियानाला प्रारंभ झाला असुन या मोहीमच्या यशस्वी अंमलबजावणी करीला मतदारांसह राजकीय पक्ष तसेच प्रसार माध्यमांनी सक्रीय सहभाग नोंदवावा असे आवाहन मतदार नोंदणी आधिकारी तथा उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव यांनी केले.

या संबधी प्रस्तृत प्रतिनिधीशी बोलतांना विषेश सखोल पुनरीक्षण (एस आय आर) अभियानाची उद्दीष्टे, कार्यपध्दती आणि मतदारांची भूमिका याबाबत सविस्तर माहिती सांगितली प्रशासनाने दिलेल्या माहिती नुसार प्रत्येक पात्र मतदाराने आपल्या मतदार केद्र स्तरीय अधिकारी (बिएलओ) यांच्याशी संपर्क साधून गणना अर्ज भरावा. मतदार यादीत नाव, पत्ता, वय छायाचित्र आदी तपशिला मध्ये आवश्यक दुरुस्ती असल्यास ही तातडीने करुण घेऊण मय्यत स्थालातरीत,दुबार मतदारांनी मतदाराची वगळणी करावी. तसेच कोणत्याही पात्र मतदार नोंदणी पासुन वंचित राहणार नाही. यासाठी मतदारांनी पुढाकार घेण्याचे आवाहण करण्यात आले.

यासह सर्व मान्यता प्राप्त राजकीय पक्षांनी आपल्या बुथ स्तरीय प्रतिनिधीच्या माध्यमातून मतदान केंद्रस्तरीय अधिकारी आणि त्यांच्या पर्यवेक्षकांना पूर्ण सहकार्य करावे .पात्र मतदारापर्यंत अभियानाची माहिती पोहचूण त्यांच्या कडून गणना अर्ज भरूण घेण्यासाठी पुढाकार घ्यावा. अशी अपेक्षा व्यक्त करत अचलपूर विधानसभा मतदार संघात विषेश सखोल पुनरीक्षण (एसआयआर) अभियान नियोजित वेळापत्रकानुसार सुरु असुन मतदान केंद्रस्तरीय अधिकारी, पर्यवेक्षक, सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी, राजकिय पक्षाचे प्रतिनिधी, प्रसार माध्यमे, मतदार यांच्या संयुक्त सहभागातून मतदार यादी अधिक अचुक, दोषमुक्त पारदर्शक करण्याचे उदिष्टे निश्चितपणे साध्य होईल. असा विश्वास उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव यांनी व्यक्त केला

## ■ शब्दकोडे क्रमांक ३११६

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ■ | ४ | | ५ |
| ६ | | | ■ | ७ | | ■ | |
| ८ | | ■ | ९ | | ■ | १० | |
| | ■ | ११ | ■ | १२ | १३ | | ■ |
| ■ | १४ | | १५ | ■ | | | १६ |
| १७ | | ■ | १८ | | ■ | १९ | |
| | ■ | २० | | ■ | २१ | | |
| २२ | | | ■ | २३ | | | |

**आडवे शब्द** : १) शीण, निरुत्साह, कंटाळा, ४) हरभरा डाळीचे पीठ, ६) पती, यजमान, ७) घडून गेलेले; स्थिती, अवस्था, ८) एक केशवर्धक वनस्पती, ९) पलीकडे; झाडाभोवतीचा कट्टा, १०) आच, उष्णता, १२) दुपारची वेळ, १४) पवित्र, पाक, १७) मिठी, १८) आकाशातून पडणारे बर्फाचे तुकडे, १९) आरोप, कुभांड, २०) पारद, द्रव धातू, २१) विधी; कोर्टकचेरीतील कलम, २२) संत, साव, प्रामाणिक, २३) अवस्था, स्थिती; ईश्वराने मानवरूपी जन्म घेणे.

**उभे शब्द** : १) मनाला वाटेल तसे वागणे, २) गोळा, ३) फणसातील गर; रवा, ४) नियोजन, योजना, निश्चय, ५) भाग्य, ७) उष्ण, १०) सूर्याची उष्णता, ११) मोह, हौस, १३) लक्ष; गबाळ मनुष्य; एकाग्र चिंतन, १४) चतकोर; ब्रेड, १५) डंका, नौबत, १६) कमावलेले लवचिक शरीर, १७) मंदिराचे पितळी शिखर, १९) सहज; प्रयत्नांशिवाय मिळालेला, २०) पर्ण; वही-पुस्तकातील कागद, २१) गेरू, तांबडी माती.

**शब्दकोडे क्रमांक ३११५ चे उत्तर :**

**आडवे शब्द** : १) कोयता, ३) जन्मदिन, ५) रतन, ६) गलका, ८) हिकमत, १०) रीता, ११) रातराणी, १२) गृहिणी, १४) मोह, १५) वर्दी, १६) वाम, १७) वासा, १९) करंजी, २०) आरपार.

**उभे शब्द** : १) कोजागरी, २) तारका, ३) जनहित, ४) दिनमणी, ७) लतागृह, ९) कराल, ११) राणीवसा, १३) समशेर, १४) मोहक, १७) वाजी, १८) पेर.

**सुडोकू क्र. ४४६५**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | | | |
| | १ | | |
| | | २ | |
| | | | ४ |

**कसे सोडवाल सुडोकू?**
सुडोकू सोडवताना उभ्या आणि आडव्या चार कॉलममध्ये एक ते चार हे अंक उभे किंवा आडवे असे बसवा की ते एका सरळ रेषेत एकदाच आले पाहिजेत.

**उत्तर क्र. ४४६४**

| | | | |
|---|---|---|---|
| २ | ४ | १ | ३ |
| १ | ३ | ४ | २ |
| ३ | १ | २ | ४ |
| ४ | २ | ३ | १ |



# कर्तव्य दक्ष राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा शेगाव येथे उत्साहात संपन्न

**विदर्भ केसरी। प्रतिनिधी / शेगाव**

संकल्प बहुद्देशीय संस्था पारस व ग्रामीण युवा बहुद्देशीय संस्था तुलंगा बु. यांच्या संयुक्त विद्यमाने शेगाव येथे कर्तव्यदक्ष राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरवातीला छत्रपती शिवाजी महाराज महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती शिवाजी महाराज व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटोचे गजानन कांबळे नगरसेवक, अश्वजीत सिरसाट सामाजिक कार्यकर्ते यांच्या हस्ते पूजन करण्यात आले व प्रसिद्ध निवेदिका कु. अश्विनी सांगळे यांनी शिवगर्जना केली आणि कार्यक्रमाला सुरवात करण्यात आली. कार्यक्रम मुख्य आयोजक नरेंद्र इंगळे, इंजी.सतिश हातोले व प्रतीक्षा वासनिक (इंगळे )या होत्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष महेंद्र डोंगरे ( मुख्य संपादक वंचितांचा प्रकाश ) मुख्य अतिथी प्रा. संजय खडसे (उपजिल्हाधिकारी ) प्रमुख पाहुणे प्रकाशभाऊ शेगोकार, नगरसेवक आकाशभाऊ सिरसाठ सम्राट अशोक सेना अध्यक्ष. शीतल शेगोकार, डॉ. समाधान कंकाळ कार्यक्रमाचे विशेष अतिथी देवानंद माहुरे (रेल्वे सुरक्षा बल ठाणे प्रभारी )यांची उपस्थिती होती. सामाजिक सेवा, साहित्यिक, कला क्षेत्र व अन्य विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या ५० लोकांना कर्तव्य दक्ष पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन हर्षदा डोंगरे आभार प्रदर्शन मोहिनी सूर्यवंशी यांनी केले कार्यक्रमाला एक हजार लोकं उपस्थित होते अतिशय उत्साहात हा कार्यक्रम संपन्न झाला.

# बंजारा विरासत संघ महाअभियानात सहभागी व्हा : श्रावण पवार यांचे आवाहन

**विदर्भ केसरी। यवतमाळ**



उपेक्षित राहिलेल्या बंजारा समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी, समाजाच्या विविध समस्या शासनापर्यंत पोहोचविण्यासाठी तसेच समाजाची अचूक लोकसंख्या, सामाजिक व शैक्षणिक स्थितीची माहिती एकत्रित करण्याच्या उद्देशाने 'बंजारा विरासत संघ' या महाअभियानाची सुरुवात करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा बंजारा समाजाचे राष्ट्रीय नेते नामदार संजय राठोड यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राज्यभर राबविण्यात येत आहे. या महाअभियानात सर्व बंजारा समाजबांधवांनी सहभागी होत बंजारा विरासत संघाच्या पोर्टलवर जाऊन आपली नोंदणी करावी, असे आवाहन बंजारा समाजाचे यवतमाळ जिल्ह्यातील नेते श्रावण पवार यांनी केले आहे. या अभियानाच्या माध्यमातून बंजारा समाजातील प्रत्येक कुटुंबाची नोंदणी करून समाजाची एक सक्षम माहिती प्रणाली तयार केली जाणार आहे. त्याआधारे समाजाच्या विविध समस्या शासनासमोर प्रभावीपणे मांडून न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. यवतमाळ जिल्ह्यात बंजारा विरासत संघाचे सदस्य श्रावण पवार यांच्या नेतृत्वाखाली प्रत्येक तांडा व गावात जनजागृती, प्रचार-प्रसार आणि सदस्य नोंदणी अभियान राबविण्यात येत असून, समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन बंजारा विरासत संघाच्या पोर्टलवर नोंदणी करावी, असे आवाहन त्यांनी केले आहे. देशभरात सुमारे १५ कोटी आणि महाराष्ट्रात २ कोटींहून अधिक लोकसंख्या असलेल्या बंजारा समाजाला एकत्र आणून सामाजिक ऐक्य, संवाद आणि समन्वय निर्माण करण्याचा ना श्री संजयभाऊ राठोड- मुख्य संयोजक बंजारा यांच्या नेतृत्वात अभियानाचा उद्देश असून सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व प्रशासकीय प्रश्नांची माहिती संकलित केली जात आहे. प्रत्येक नागरिकाला आपल्या अडचणी, समस्या, सूचना नोंदविण्यासाठी सक्षम व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. या नोंदणीतून समाजाचे प्रश्न शासन व प्रशासनापर्यंत पोहोचविण्याचे काम 'बंजारा विरासत संघ' करीत आहे. यवतमाळ जिल्ह्यात या अभियानाला समाज बांधवांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, आगामी काळात प्रत्येक तांडा व गावात जाऊन सदस्य नोंदणी पूर्ण करण्याचा संकल्प आहे," अशी माहिती इंजि. महेश श्रावण पवार, सदस्य, बंजारा विरासत यांनी दिली आहे.




# 20 जुलैपर्यंत कृषी पायाभूत सुविधा निधी योजनेसाठी विशेष मोहीम

**विदर्भ केसरी। यवतमाळ, :**

केंद्र शासनाच्या कृषी पायाभूत सुविधा निधी योजनेअंतर्गत जिल्ह्यात 20 जुलैपर्यंत विशेष अंमलबजावणी मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेत पात्र शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपन्या, सहकारी संस्था तसेच इतर पात्र लाभार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी तथा प्रकल्प संचालक आत्मा मनोजकुमार ढगे यांनी केले आहे. आत्मनिर्भर भारत अभियानांतर्गत ऑगस्ट 2020 पासून सुरू असलेल्या या योजनेद्वारे पीक काढणीनंतरच्या कृषी पायाभूत सुविधा तसेच सामुदायिक शेतीसाठी आवश्यक प्रकल्प उभारणीसाठी सवलतीच्या व्याजदराने कर्ज उपलब्ध करून दिले जाते. त्यामुळे शेतमालाची साठवणूक, प्रक्रिया, मूल्यवर्धन, वाहतूक आणि विपणनाला चालना मिळून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत होत आहे. या योजनेअंतर्गत बँकांकडून मंजूर होणाऱ्या दोन कोटी रुपयांपर्यंतच्या कर्जावर तीन टक्के व्याज सवलत तसेच पतहमी क्रेडिट गॅरंटी सुविधा दिली जाते. गोदामे, शीतगृहे, पॅक हाऊस, ग्रेडिंग व सॉर्टिंग युनिट, प्राथमिक प्रक्रिया केंद्र, कृषी लॉजिस्टिक, सायलो, रायपनिंग चेंबर, ई-मार्केट सुविधा, जैव इनपुट उत्पादन केंद्र आणि कस्टम हायरिंग सेंटर यांसारख्या कृषी पायाभूत सुविधा उभारण्यासाठी अर्थसहाय्य दिले जाते.

दैनिक विदर्भ केसरी RNI MAHMAR/2022/88796 हे वृत्तपत्र प्रकाशक अमोल नरेश कंटाळे यांच्याव्दारे दैनिक विदर्भ केसरी कार्यालय शमीम आझाद शाळा दर्यापूर. जि. अमरावती कार्यालय, येथून मालक अमोल नरेश कंटाळे यांच्या वतीने प्रकाशित केलेले असून संपादक अमोल कंटाळे यांनी संपादीत केलेले आहे. आणि मुद्रक साई दर्पण प्रकाशन यांनी सिव्हिल लाइन दर्यापूर ता. दर्यापूर जिल्हा अमरावती पिन 444803 येथे मुद्रीत केलेले आहे. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीशः संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास दर्यापूर न्यायालया अंतर्गत)

Printed by-Amol Naresh kantale (printer name) and published by- Amol Naresh kantale (Owner name) and printed at-SAI DARPAN PRAKASHAN civil line, Daryapur Tq-Daryapur dist, Amravati Maharashtra 444803 (name & complete address of printing press)and published at-shamim Azad school Rajputpura, Daryapur, dist, Amravati, Maharashtara-444803 complete place of publication-Editor-Amol Naresh Kantale(Editor name ) tital code. MAHMAR51049 l,
Email:-vidarbhkesari21@gmail.com Mob-9975532291,9096945629

## GOOD MORNING कॉटनसिटी
!! मन-मनात दारा-दारात फक्त विदर्भ केसरी!!



# माणुसकीच्या हातांनी पुन्हा पेटली जगण्याची आशेची ज्योत

### शेंबाळपिंपरीतील आगग्रस्त सुभाष राऊत कुटुंबाला वेदवीर सेवाभावी संस्थेचा आधार; अध्यक्षा सौ. वृषालीताई वडत्या (नाईक) यांची तातडीची मदत

**▸विदर्भ केसरी। शेंबाळपिंपरी**
**प्रतिनिधी गजानन मनवर**



शेंबाळपिंपरी येथील श्री. सुभाष राऊत यांच्या घराला अचानक भीषण आग लागून त्यांच्या कष्टाने उभारलेल्या संसाराची अक्षरशः राखरांगोळी झाली. घरातील कपडे, धान्य, भांडी, शैक्षणिक साहित्य, संसारोपयोगी वस्तू आणि अनेक वर्षांच्या मेहनतीचे स्वप्न काही क्षणांत आगीत भस्मसात झाले. उघड्यावर आलेल्या राऊत कुटुंबाच्या डोळ्यांतील अश्रूंनी संपूर्ण गाव हेलावून गेले. या दुर्दैवी घटनेची माहिती सामाजिक कार्यकर्ते राजेश वाहुळे यांनी शेंबाळपिंपरी गावाच्या व्हॉट्सॲप समूहावर प्रसारित केली. त्यानंतर ही माहिती वेदवीर सेवाभावी संस्था, पुसदच्या अध्यक्षा तथा माजी कॅबिनेट मंत्री स्व. मनोहरराव भाऊ नाईक यांच्या कन्या सौ. वृषालीताई वडत्या (नाईक) यांच्यापर्यंत पोहोचताच त्यांनी कोणताही विलंब न करता मदतीचा निर्णय घेतला. वेदवीर सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून आगग्रस्त राऊत कुटुंबाला शिलाई मशीन, संपूर्ण कुटुंबासाठी नवीन कपडे, जीवनावश्यक भांडी तसेच इतर अत्यावश्यक साहित्य प्रदान करण्यात आले. या मदतीमुळे उद्ध्वस्त झालेल्या कुटुंबाला केवळ जीवनावश्यक वस्तूंचाच आधार मिळाला नाही, तर नव्याने उभे राहण्याचा आत्मविश्वास आणि जगण्याची नवी उमेदही मिळाली.

"दान म्हणजे वस्तू देणे नव्हे; तर संकटाने खचलेल्या माणसाच्या आयुष्यात पुन्हा आशेचा किरण निर्माण करणे होय." कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सौ. जयश्रीताई देशमुख यांनी केले. त्यांनी वेदवीर सेवाभावी संस्थेच्या सामाजिक बांधिलकीचा गौरव करत, संकटग्रस्तांच्या मदतीसाठी संस्था सातत्याने कार्यरत असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन राजेश वाहुळे (माजी संचालक, शेंबाळपिंपरी) यांनी केले. याप्रसंगी वेदवीर सेवाभावी संस्थेच्या अध्यक्षा सौ. वृषालीताई वडत्या (नाईक), संस्थेचे उपाध्यक्ष तथा पुसद नगर परिषदेचे माजी बांधकाम सभापती मनीषभाऊ शाह, डॉ. जयश्रीताई देशमुख, सौ. पल्लवीताई देशमुख, कुणाल देशमुख, प्रा. वसंत राठोड, धरमसिंग राठोड (महाराज, पोहरादेवी), प्रमुख पाहुणे जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष जैनुलभाई सिद्दिकी, परिसरातील प्रसिद्ध बालरोगतज्ज्ञ तथा भाजपा तालुका मंडळ अध्यक्ष डॉ. अजित चंदेल, दिलीपराव देशमुख,

> **"राख झालेल्या संसाराला पुन्हा उभारी देणारे हात म्हणजेच खरी माणुसकी!"**
>
> ■ **वेदवीर सेवाभावी संस्थेने केलेली ही मदत केवळ साहित्याचे वाटप नसून, संकटाने उद्ध्वस्त झालेल्या एका कुटुंबाच्या आयुष्यात नवजीवन फुंकणारी ठरली आहे. समाजातील गरजूंच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची संस्थेची परंपरा पुन्हा एकदा अधोरेखित झाली असून, या सेवाभावी कार्याचे सर्व स्तरांतून मनःपूर्वक कौतुक होत आहे.**

संजय देशमुख, यशवंत विद्यालय शेंबाळ पिंपरी चे प्राचार्य संग्राम देशमुख सुनील वाहुळे, रऊफभाई सिद्दिकी, संग्राम देशमुख, देविदास कांबळे, सोनबा वाहुळे, सुभाष डाखोरे, बाळा मास्तर देशमुख, मोहम्मद शाकीर, लाभार्थी सुभाष राऊत व त्यांचे कुटुंबीय तसेच गावातील अनेक मान्यवर आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. अध्यक्षीय समारोपात सौ. वृषालीताई वडत्या (नाईक) यांनी भावनिक शब्दांत सांगितले की, "समाजातील कोणत्याही कुटुंबावर संकट कोसळले, तर वेदवीर सेवाभावी संस्था त्यांच्या मदतीसाठी सदैव सर्वप्रथम धावून जाईल. गरजूंच्या चेहऱ्यावर पुन्हा हास्य फुलवणे, हाच आमच्या संस्थेचा खरा ध्यास आहे." त्यांच्या या आश्वासक शब्दांचे उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात स्वागत केले.

# 'त्या' विद्युत तारेमुळे नागरिकांना जीवितास धोका

**▸विदर्भ केसरी। वाशिम :**

रिसोड तालुक्यातील दापुरी खुर्द येथे शासनाच्या घरकुल योजनेअंतर्गत सुमारे 25 वर्षांपूर्वी बांधण्यात आलेल्या 18 घरकुलांवरून 11 के.व्ही.ची उच्चदाब विद्युत वाहिनी गेल्याने येथील नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाला आहे. या घरांमध्ये राहणाऱ्या कुटुंबांना कायम भीतीच्या वातावरणात जीवन जगावे लागत आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, ही विद्युत वाहिनी अनेक वर्षांपूर्वीची असून तिच्या तारा झिजून बारीक झाल्या आहेत. तसेच विद्युत तारेचे फिटिंग व इतर साहित्यही जीर्ण झाल्यामुळे कधीही तार तुटून मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता आहे. यापूर्वीही घराजवळ विद्युत तार तुटून पडल्याची घटना घडली होती. मात्र, सुदैवाने त्यावेळी कोणतीही जीवितहानी झाली नव्हती. या गंभीर समस्येबाबत 2015 पासून आजपर्यंत संबंधित महावितरण कार्यालयाकडे 11 के.व्ही. विद्युत वाहिनीचे तातडीने स्थलांतर करण्यासाठी अनेक वेळा लेखी तक्रारी व निवेदने देण्यात आली आहेत. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. ग्रामस्थांनी प्रशासन व महावितरणकडे तातडीने या विद्युत वाहिनीचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करून संभाव्य दुर्घटना टाळण्याची मागणी केली आहे. अन्यथा भविष्यात विद्युत तार तुटून जीवितहानी अथवा मालमत्तेचे नुकसान झाल्यास त्यास संबंधित विद्युत विभाग व जबाबदार अधिकारी-कर्मचारी हेच पूर्णपणे जबाबदार राहतील, असा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

## महत्त्वाचे

### पावसाने दडी मारल्याने शेतकरी संकटात!

**▸विदर्भ केसरी। महागाव: शेरखान पठाण**

-तालुक्यात जुलै महिन्याच्या सुरुवातीला तीन - चार दिवस पाऊस रिमझीम स्वरूपात झाला त्यावेळी शेतकऱ्यांनी संपूर्ण पेरण्या केल्या सोयाबीन कापूस उडीद मुंग असा पेरा शेतकऱ्यांनी केला पण चार ते सहा दिवस झाले पावस आता बेपता झाला त्यामुळे शेतकऱ्यांच्या चिंता वाढले आहे अनेकांचे सोयाबीन बियाणे उगवलेच नाही त्यामुळे शेतकऱ्यांनी पुन्हा पेरणी केली त्यामुळे आता पुन्हा शेतकऱ्यावर पावसाची नितांत आवश्यकता आहे पाऊस नाही सध्या सकाळपासून कडक ऊन पडत आहे शेतकऱ्यांनी महागडे बियाणे पेरले कुठे उगवले तर उगवले नाही त्यामुळे शेतकरी वर्ग चिंतातूर दिसत आहे पावसाअभावी काळे रान दिसत आहे शेतकऱ्यांनी महागडे बियाने पेरले कर्ज काढून शेती मध्ये बियाणे पेरले आठवड्यापासून पावस बेपता झाला आहे. शेतकरी त्रस्त आहे शेतकऱ्यांचे लक्ष आभाळाकडे आहे तालुक्यात दोन ते तीन पाऊस मोठ्या प्रमाणात झाले तेव्हापासून पाऊस बेपत्ताच आहे

### तरुणाच्या डोक्यात वीट मारली

**▸विदर्भ केसरी। लोहारा:**

यवतमाळ जवळील लोहारा येथील इंदिरानगर भागात दारू पिऊन शिवीगाळ करणाऱ्या युवकाला जाब विचारला असता, त्याने फिर्यादीच्या डोक्यात वीट मारून गंभीर जखमी केले. आशिष इंद्रपालसिंग ठाकूर (३१, रा. इंदिरानगर, लोहारा) यांनी याप्रकरणी तक्रार दिली आहे. पोलिसांनी आरोपी अभिषेक शंकरराव कोडापे (२५, रा. देवीनगर, लोहारा) याच्याविरुद्ध भा.न्या.सं. कलम ११८(१), ३५२, ३५१(२) नुसार गुन्हा नोंदवला आहे. १५ जुलैच्या मध्यरात्री सव्वा बाराच्या सुमारास ही घटना घडली.

# मानव विकासच्या बस सेवा बंद; विद्यार्थिनींचा प्रशासनावर संताप



**▸विदर्भ केसरी। प्रतिनिधी**
**महागाव ता. शेरखान पठाण**

महागाव येथील सावित्रीबाई फुले कन्या विद्यालयातील विद्यार्थिनींसाठी चालविण्यात येणाऱ्या मानव विकास योजनेअंतर्गत बस सेवा अचानक बंद करण्यात आल्याने विद्यार्थिनींमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या बस नियमितपणे पूर्ण क्षमतेने भरून धावत असतानाही पुसद आगार प्रशासनाने कोणतेही ठोस कारण न देता तीन बस सेवा बंद केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

विद्यार्थिनींनी पुसद आगार व्यवस्थापकांना या निर्णयाबाबत जाब विचारला असता, "विद्यार्थिनींचे बस पास पुसद आगारातूनच काढावेत," या कारणामुळे हा निर्णय घेण्यात आल्याचे सांगण्यात आल्याचा विद्यार्थिनींचा दावा आहे. मात्र, महागाव तालुक्यातील विद्यार्थिनी महागाव येथूनच बस पास काढत असल्याने पुसद आगाराशी त्यांचा थेट संबंध नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. बस सेवा बंद झाल्यामुळे अनेक विद्यार्थिनींना वेळेवर शाळेत पोहोचणे कठीण होत असून त्यांच्या शिक्षणावर परिणाम होत आहे. काही विद्यार्थिनींना आर्थिक अडचणींमुळे खासगी वाहनांचा पर्यायही उपलब्ध नसल्याने शिक्षणापासून वंचित राहण्याची वेळ येत असल्याची खंत व्यक्त करण्यात आली. दरम्यान, सामाजिक कार्यकर्त्यांनी मानव विकास योजनेच्या बस सेवा तात्काळ पूर्ववत सुरू कराव्यात, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा दिला आहे. विद्यार्थिनींनीही मानव विकास योजनेअंतर्गत पूर्वीप्रमाणे बस सेवा सुरू करून शिक्षणासाठी आवश्यक वाहतूक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी केली आहे. विद्यार्थिनींच्या शिक्षणात अडथळे निर्माण होण्यास जबाबदार कोण, असा सवालही यावेळी उपस्थित करण्यात आला आहे.

# मसोद ता. जि. अमरावती येथे चारा प्रक्रिया (Fodder Treatment) प्रात्यक्षिक संपन्न

**▸विदर्भ केसरी।**




डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला सलंग्नित व श्रमसाफल्य फाउंडेशन, अमरावती द्वारा संचलित सौ. वसुधाताई देशमुख कृषी महाविद्यालय, बोडणा, अमरावती येथील पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभागा अंतर्गत सातव्या सत्रातील विद्यार्थ्यांनी ग्राम मसोद येथे ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रम (RAWE) व AIA अंतर्गत चारा प्रक्रिया (Fodder Treatment) या विषयावर प्रात्यक्षिकाचे आयोजन केले.

या प्रात्यक्षिकामध्ये पशुपालकांना कमी खर्चात पौष्टिक व रुचकर पशुखाद्य तयार करण्याची पद्धत प्रत्यक्ष दाखवून देण्यात आली. प्रात्यक्षिकादरम्यान ३२० ग्रॅम युरिया, ८० ग्राम गूळ व ८० ग्राम मीठ यांचा वापर करून ८ किलो चाऱ्यावर प्रक्रिया कशी करावी याचे मार्गदर्शन करण्यात आले. या प्रक्रियेमुळे चाऱ्याची पचनक्षमता व पौष्टिकता वाढते, जनावरांना आवश्यक पोषक घटक मिळतात, दूध उत्पादनात वाढ होते तसेच पशुधनाचे आरोग्य सुधारण्यास मदत होते, अशी माहिती विद्यार्थ्यांनी दिली.या कार्यक्रमास स्थानिक पशुपालक उपस्थित होते. त्यांनी चारा प्रक्रिया, पशुखाद्य व्यवस्थापन व जनावरांच्या पोषणाबाबत विविध प्रश्न विचारून मार्गदर्शन घेतले. सदर प्रात्यक्षिक राबवण्यासाठी पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभागाचे प्राध्यापक उदय देशमुख यांचे तांत्रिक मार्गदर्शन लाभले. कार्यक्रम आयोजनाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती वसुधाताई देशमुख तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय देशमुख यांनी समाधान व्यक्त केले. कार्यक्रम राबवण्यासाठी रावे कार्यक्रम समन्वयक प्राध्यापिका सौ. स्वाती देशमुख व रावे कार्यक्रम अधिकारी प्रा. सौरभ इंगोले यांनी सहकार्य केले. कार्यक्रमासाठी गावातील संजय अडसड, जय काळबांडे, मुकेश खंडारे, वैभव नंदनवार, अमोल निंबोरकर व सुभाषराव मालठाणे हे शेतकरी उपस्थित होते.

# स्वयंपाक कराव की मच्छर मारावं?

**कणकी एमएसईबीचा भोंगळा कारभार...! इजिनियर ला दोंडी व लेखी निवेदन देऊन तरी विज पुरवठा खडीत.. दोन दिवसा मध्ये विज नाही आली तर किनवट मध्ये अंदोलन करणार.. नामदेव सलाम ...?**

**▸विदर्भ केसरी। किनवट ता.प्र.**
**डॉ.भारत राठोड**



नियमित वीजबिल भरूनही डोगरगाव जरूर तांडा कोठारीतील नागरिकांना मागील दोन दिवसापासून वीजपुरवठा बंद असल्यामुळे मोठा त्रास सहन करावा लागत आहे. संध्याकाळचे सहा वाजले की विज गायप सयंपाक व विधार्थी आभासचे खूप मोठे त्रास सहन करावा लागत आहे

डोगरगाव व जरूर येथील सहासे नागरिक एम एस सिबी कणकी येते हला बोल आक्रमन केले उकाड्यामुळे लहान मुले, वृद्ध नागरिक आणि रुग्णांचे हाल होत आहेत. सर्वात गंभीर बाब म्हणजे संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचे मोबाईल फोन "नॉट रिचेबल" येत आहेत. नागरिकांच्या अडचणी जाणून घेण्याऐवजी अधिकारी जबाबदारी झटकत आहेत का, असा प्रश्न निर्माण झाला आहे. नागरिक वेळेवर वीजबिल भरतात, मात्र त्याबदल्यात त्यांना अंधार, त्रास आणि अधिकाऱ्यांची बेपर्वाई मिळत आहे. अशा लाचार आणि निष्क्रिय अधिकाऱ्यांवर संबंधित विभागाने तात्काळ कारवाई करावी व अखंड वीजपुरवठा सुरू करावा. "जनतेचे पैसे घेताना तत्परता आणि सेवा देताना उदासीनता, हा कोणता कारभार...?" जन आक्रोश ओढावण्या अगोदर महावितरण ने वेळीच दखल घेत नियमित विज पुरवठा करावा अशी मागणी होत आहे

### स्प्रिंकलरचे नोझल चोरी

**▸विदर्भ केसरी। दारव्हा:**

बोरी अरब येथील शेतकरी अविनाश भास्कर तिवारी (५१) यांच्या शेतातून स्प्रिंकलर सेटला जोडलेली २१ जुनी पिवळ्या धातूची नोझल अज्ञात चोरट्याने चोरून नेली. चोरून नेलेल्या मालाची किंमत ६ हजार ३०० रुपये आहे. दारव्हा पोलिसांनी अज्ञात चोराविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

### दिग्रसमध्ये घरफोडी

**▸विदर्भ केसरी। दिग्रस:**

गिरीराज पार्क परिसरामध्ये १५ जुलै रोजी सकाळी १०.४५ ते ११.०७ या अवघ्या २२ मिनिटांच्या कालावधीत अज्ञात चोराने दिवसाढवळ्या घरफोडी केली. श्रीगजानन संभाजी इंगळे (५६, रा. गिरीराज पार्क, मूळ रा. तुपटाकळी) यांच्या घराचे कुलूप तोडून चोरट्याने लॉकरमधील १५ तोळे ७ ग्रॅम सोने, ३० तोळे चांदी आणि नगदी ३,००० रुपये असा एकूण ५ लाख ३९ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला.

# निष्पक्ष चौकशी करुन दोषीवर कारवाई करा

**घाटंजी येथे काँग्रेस कमिटीतर्फे रघुपती राजाराम सत्याग्रह आंदोलन**

**▸विदर्भ केसरी। तालुका**
**प्रतिनिधी अरविंद चौधरी**



घाटंजी राममंदिर देवस्थान परिसर येथे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या निर्देशानुसार, अयोध्येतील श्रीराम मंदिराच्या दानपेटी व देणगी निधीत झालेल्या कथित गैरव्यवहार व चोरीच्या निषेधार्थ घाटंजी तालुका काँग्रेस कमिटी व घाटंजी शहर काँग्रेस कमिटीच्या संयुक्त विद्यमाने आज सकाळी ११.०० वाजता राम मंदिर चौक, घाटंजी येथील श्रीराम मंदिरासमोर "रघुपती राघव राजाराम" सत्याग्रह आंदोलन करण्यात आले. आंदोलनाची सुरुवात श्रीरामांच्या प्रतिमेचे पूजन व आरती करून करण्यात आली. त्यानंतर उपस्थितांनी "रघुपती राघव राजाराम" या भजनाचे सामूहिक गायन करत शांततापूर्ण सत्याग्रह केला. यावेळी श्रीराम मंदिराच्या देणगी व्यवस्थेतील कथित गैरव्यवहाराची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. तसेच मंदिरातील भक्तांच्या श्रद्धेशी संबंधित कोणत्याही प्रकारच्या गैरव्यवहाराला आळा घालण्याची मागणी करण्यात आली. व पोलीस स्टेशन ला निवेदन देण्यात आले आले या आंदोलनात काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. यावेळी रुपेश कल्यमवार (अध्यक्ष, घाटंजी तालुका काँग्रेस कमिटी),माणिकराव मेश्राम,माजी जीं प अध्यक्ष ,संगीताताई भुरे गटनेता न प घाटंजी पंकजाताई कहाळे नगरसेवक किशोर भाई दावड,वासुदेवराव महल्ले,अनंत चौधरी, अरविंद चौधरी, वैजयंती ठाकरे, डॉ. प्रीती सिडाम,,राजु मुनेश्वर,विनोद मुनगीनवर, सुरेश आडे, सुनील हूड, अक्षय पवार, अमृत पेंदोर, गजानन काकडे,संजय वाजपेई,श्रावण नाईक,विजय रामटेके,शोभाताई ठाकरे,अरुणाताई महल्ले,सारंग भाऊ कहाळे,सुनंदा महल्ले,निर्मला डाखोरे,शिल्पा निवल,वैशाली किनकर,रेणुका ताई आत्राम ,विजय जिवतोडे, पुरोशत्तम महाजन मडावी साहेब जितेंद्र जुनघरे,संतोष आत्राम,संतोष किन्हकर उमेश कुडमते विक्की ढवळे यांच्यासह काँग्रेसचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

# श्री गाडगे महाराज कनिष्ठ महाविद्यालयात ११ वीचा प्रवेशोत्सव उत्साहात संपन्न!

**▸ विद्यार्थ्यांना शिस्त, नियम आणि आरोग्याचे धडे; शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या परिश्रमातून कार्यक्रम यशस्वी.**

**▸विदर्भ केसरी।मूर्तिजापूर**



कारंजा बायपास परिसरातील नामांकित 'श्री गाडगे महाराज कनिष्ठ कला व वाणिज्य महाविद्यालय' येथे काल, १५ जुलै रोजी नवीन प्रवेशित झालेल्या इयत्ता ११ वीच्या विद्यार्थ्यांचा 'प्रवेशोत्सव' अत्यंत उत्साहात आणि दिमाखात संपन्न झाला. नवीन शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांचे स्वागत करून त्यांना महाविद्यालयाच्या वातावरणाशी जुळवून घेता यावे, या उद्देशाने या विशेष सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. समृद्ध परंपरेची ओळख आणि विषय शिक्षकांचा परिचय कार्यक्रमाच्या सुरुवातीला नवोदित विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या आजवरच्या देदीप्यमान आणि समृद्ध शैक्षणिक परंपरेची सविस्तर माहिती देण्यात आली. कला व वाणिज्य शाखेतील सर्व विषय शिक्षकांनी स्वतःचा परिचय करून देत, विद्यार्थ्यांना आगामी वर्षातील अभ्यासक्रम आणि शैक्षणिक वाटचालीबाबत मार्गदर्शन केले. या प्रसंगी वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक वृंद प्रामुख्याने उपस्थित होते. शिस्त, उपस्थिती आणि आरोग्यावर विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाला उपस्थित सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना महाविद्यालयातील नियम, नियमित उपस्थितीचे महत्त्व आणि कठोर शिस्त यावर प्रकाश टाकला. केवळ अभ्यासातच नव्हे, तर सुदृढ आरोग्यासाठी विद्यार्थ्यांनी कशा प्रकारे काळजी घ्यावी, याविषयी त्यांनी अत्यंत मोलाचे व व्यावहारिक मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील ११ वी हे वर्ष त्यांच्या भविष्याची पायाभरणी करणारे असते. त्यामुळे शिस्त आणि नियमितता पाळणे अत्यंत गरजेचे आहे.

शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे योगदान हा सोहळा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. यामध्ये प्रामुख्याने:

डॉ. अमिता तायडे, सुशील केकान,चंद्रशेखर नामजोशी, गिरीश चवरे, मीनल तायडे, कल्पना तरवाडे, प्रियंका चारथळ आणि १२ वीच्या विद्यार्थ्यांनी मोलाचे योगदान दिले.

एमसीव्हीसी विभाग सहकार्य: एमसीव्हीसी विभागाचे दीपक तिडके, सतीश बेंद्रे, प्रकाश नाचणे, स्वप्निल घाटे तसेच सर्व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या अथक परिश्रमामुळे हा कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने संपन्न झाला. या प्रवेशोत्सवामुळे नवोदित विद्यार्थ्यांमध्ये एक नवा उत्साह आणि ऊर्जा पाहायला मिळाली, तसेच महाविद्यालयातील पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे झालेले हे जंगी स्वागत परिसरात कौतुकाचा विषय ठरले आहे.

# दोन रेती तस्कर जेरबंद

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**

शरद येथील वाघाडी नदीपात्रातून अवैधरित्या रेतीची चोरी करून वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरवर पारवा पोलीस आणि महसूल विभागाने संयुक्त धडक कारवाई केली आहे. या कारवाईत पोलिसांनी ५ लाख ७ हजार रुपयांच्या मुद्देमालासह १ ब्रास रेती व महिंद्रा ट्रॅक्टर जप्त केला असून दोन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

चालक कैलास अशोक टेकाम (वय २१) आणि ट्रॅक्टर मालक निखिल रमेश साबापुरे (वय ३१, दोन्ही रा. शरद, ता. घाटंजी) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.मिळालेल्या माहितीनुसार, १६ जुलै २०२६ रोजी रात्री २:२० वाजताच्या सुमारास महसूल आणि पोलीस विभागाचे संयुक्त पथक गस्त घालत होते. वाघाडी नदीपात्रातून अवैधरित्या रेतीची चोरी करून वाहतूक केली जात असल्याची गुप्त माहिती मिळताच, पथकाने शरद येथील पांदण रस्त्याजवळ सापळा रचला. पहाटे २:३०



वाजताच्या सुमारास संशयास्पद लाल रंगाचा महिंद्रा ट्रॅक्टर (MH-29 CB 4087) ट्रॉलीसह येताना दिसला. पथकाने तो थांबवून पाहणी केली असता, त्यात सुमारे १ ब्रास रेती आढळून आली या प्रकरणी ग्राम महसूल अधिकारी श्रीकांत नामदेवराव भेंडे (वय ३६, नियुक्ती घाटंजी) यांच्या लेखी तक्रारीवरून पारवा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. सदर यशस्वी कारवाई ठाणेदार हेमंत चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि गोपाल राठोड, महसूल अधिकारी निखिल आत्राम, राहुल राठोड व राजू गेडाम यांच्या संयुक्त पथकाने पार पाडली असून पुढील तपास सुरेश येलपुलवार करत आहेत.

दैनिक विदर्भाचा मानबिंदू
# विदर्भ केसरी
शुक्रवार, १७ जुलै २०२६ | ४

# विदर्भ
GOOD MORNING

!! मना-मनात दारा-दारात फक्त विदर्भ केसरी!!

## ग्रामपंचायत निवडणुकांसाठी मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर

■ यवतमाळ : जिल्ह्यातील बिगर व अंशत:अनुसूचित क्षेत्रातील सन २०२४ व २०२५ मध्ये मुदत संपलेल्या तसेच सन २०२६ मध्ये मुदत संपणाऱ्या आणि नव्याने स्थापन झालेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी संगणक प्रणालीद्वारे तयार करण्यात येणाऱ्या मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. या निवडणुकांसाठी १५ एप्रिल २०२६ हा मतदार यादी ग्राह्य धरण्याचा दिनांक निश्चित करण्यात आला आहे. कार्यक्रमानुसार, २४ जुलै रोजी प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. या यादीवर नागरिकांना २४ ते २९ जुलै २०२६ या कालावधीत हरकती व सूचना दाखल करता येणार आहेत.

**महत्त्वाचे**

## एसटीच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त कळंब बसस्थानक परिसरात वृक्षारोपण

**▸विदर्भ केसरी। कळंब | प्रतिनिधी**



महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त राज्यभर राबविण्यात येत असलेल्या वृक्षारोपण उपक्रमांतर्गत कळंब आगाराच्या वतीने कळंब बसस्थानक परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कळंब नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मा. अफरोज बेगम फारूक अहमद सिद्दीकी या होत्या. प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ पत्रकार अशोक उमरतकर, शिवसेना नेते अभी पांडे, श्री चिंतामणी देवस्थानचे सचिव बसवेश्वर माहुलकर, नगरसेवक कुशल बोकडे, आगार लेखाकार वायकर साहेब (यवतमाळ), कळंब वाहतूक नियंत्रक राठोड साहेब, नितीन धनुस्कर, श्रीमती रमा ठोंबरे तसेच भीमराव सोनाळे उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते विविध वृक्षांची लागवड करण्यात आली. पर्यावरण संवर्धन, हरित परिसर निर्मिती आणि वृक्षसंवर्धनाचा संदेश देण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी वृक्षारोपणासोबतच लावलेल्या वृक्षांचे संगोपन करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाला परिवहन महामंडळाचे अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. पर्यावरण संरक्षणासाठी प्रत्येकाने किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे जतन करावे, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.



## माऊलीची चरणसेवा करण्याकरिता फलटनला निघाली माणुसकीची भिंत व मिशन ग्रीन पुसद

**▸विदर्भ केसरी। पुसद प्रतिनिधी विजय निखाते**

मंदिरी बैसोनि नाक दाबावे। त्यापेक्षा मार्गीचे काटे उचलावे। दु:खितासि प्रेमे पाणी पाजावे । हे श्रेष्ठ तीर्थस्नानाहूनि ॥ संत तुकडोजी महाराजांच्या या म्हणीची प्रेरणा घेऊन व गाडगेबाबांच्या विचारावर मागील दहा वर्षापासून कार्य करत आहे आज दिनांक १६/०७/२०२६ रोजी पुसद इथून फलटण या ठिकाणी वारकऱ्यांची चरण सेवा करण्याकरिता पुसद येथे माणुसकीचे भिंत सोशल फाउंडेशन व मिशन ग्रीन बहुउद्देशीय संस्था पुसद यांचे संयुक्त विद्यमाने,पांडुरंगाचे दर्शन घेण्याकरिता संपूर्ण महाराष्ट्रातून हजारो वारकरी पंढरपूरला पायी वारी करीत असतात. या वारकरी यांचे शारीरिक कष्ट कमी करण्याकरिता व त्यांची चरण सेवा करण्याकरिता पुसद येथून फलटण या ठिकाणी 17 तारखेला पुसद मधून माणुसकीच्या भिंतीचे अध्यक्ष गजानन जाधव, सप्तक खंजिरी वादक सत्यपाल महाराजांचे शिष्य पंकज पाल महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली फलटण येथे सेवा देण्याकरिता पुसद येथून सेवेकरी रवाना झाले. याकरिता लागणारे मसाजचे तेल दोन्ही संघटनेने स्वखर्चाने जमा केले व तसेच मसाज करिता लागणारे ऑइलमेंट श्री संतोषभाऊ तडकसे यांनी विनामूल्य दिले तसेच तेल यवतमाळचे श्री श्रीहरी बट्टावार यांनी विनामूल्य दिले या सेवेकरीता सप्तखंजिरी वादक श्री पंकजपाल महाराज, माणुसकीची भिंत सोशल फॉउंडेशनचे अध्यक्ष गजानन जाधव, संतोष गावंडे , धनंजय आत्राम, अनंत चतुर ,मिशन ग्रीनचे अध्यक्ष रमेश डंबोळे , उपाध्यक्ष एडवोकेट पवन बोजेवार, ,मिशन ग्रीन बहुउद्देशीय संस्थेचे निखिल गादेवार, सुरेश लव्हाळे,सदा पांढरे विठ्ठल शिंदे सेवेकरी आज रवाना झाले...

## वृद्धाला मारहाण

**▸विदर्भ केसरी। कळंब:**

दोन वर्षांपूर्वी खरेदी केलेल्या जागेवर खत टाकत असताना जुन्या मालकाने वाद घालत एका ४५ वर्षीय व्यक्तीला लाकडी दांड्याने डोक्यावर मारून जखमी केल्याची घटना आष्टी येथे घडली. विनोद विठ्ठलराव कोवे (४५, रा. आष्टी) यांनी दिलेल्या तक्रारीवरून आरोपी सुरेश विठोबाजी मेश्राम (४८, रा. आष्टी) याच्याविरुद्ध कळंब पोलीस ठाण्यात भा.न्या.सं. कलम ११८(१), ३५२, ३५१(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १५ जुलै रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास ही घटना घडली असून, आरोपीने फिर्यादीला जागा रिकामी करण्याची धमकी देत शिवीगाळ व मारहाण केली.

## जांबरोड परिसरात घरफोडी

यवतमाळ: अवधूतवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जांबरोड ले-आऊट, मालिनी ले-आऊट येथे अज्ञात चोरांनी भरदिवसा घरफोडी करून २६,००० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला.

# स्मार्ट मिटरविरोधात एकवटले ढाणकीकर

### सहाय्यक अभियंत्यावर जनता जनार्दन नाराज : ढाणकीची बाजारपेठ कडकडीत बंद

**▸विदर्भ केसरी। प्रतिनिधी। ढाणकी : मिलिंद चिकाटे**



स्मार्ट मीटर सक्ती तसेच वाढीव वीज बिलाच्या विरोधात ढाणकी येथे आज 16 जुलै रोजी सर्वपक्षीय बंद तसेच महामोर्चा काढुन विज वितरण कार्यालया समोर दिड तास रास्ता रोको आंदोलन करून ढाणकी वासीयांनी आपला आक्रोश व्यक्त केला .

महावितरण कंपनीने लादलेल्या स्मार्ट मीटर सक्तीच्या विरोधात व तसेच वाढीव विज बिल कमी करून देखभाल दुरुस्तीच्या कामाची उच्चस्तरिय चौकशी करण्यात यावी या मागण्यांसाठी आज सकाळी ११ वाजता डफड्यांच्या आवाजात तसेच महावितरणच्या जुलमी स्मार्ट मिटर विरोधात घोषणा देत हजारोंचा महामोर्चा विज वितरण कार्यालयावर धडकला. आज सकाळपासूनच व्यापाऱ्यांनी आपली प्रतिष्ठाने दुपारी १२ वाजेपर्यंत कडकडीत बंद ठेवून या महामोर्चाला पाठिंबा दर्शविला होता. तर महामोर्चा विजवितरण कार्यालयावर धडकणार हे माहित असूनही विजवितरण कंपनीने कार्यकारी अभियंता यांना मोर्चेकरी यांचेशी बोलणे करण्यासाठी न पाठविता प्रभारी अभियंता कानडे यांना पाठविल्याने मोर्चेकरी यावेळी आक्रमक झाले . यानंतर तब्बल दिड तास ढाणकी - फुलसावंगी रस्त्यावर कार्यालया समोरच आंदोलन कर्त्यांनी रास्ता रोको करण्यास सुरुवात केल्याने या मार्गावरील वाहतूक खोळंबली होती.

महावितरणच्या अनागोंदी कारभारामुळे शहरवासी त्रस्त झाले आहेत, मनमानी पद्धतीने वाढीव विज बिल ग्राहकांच्या माथी मारण्याचे काम सुरू आहे, ग्राहकांची कुठलीही परवानगी न घेता फॉल्टी मीटर च्या नावाखाली सर्रासपणे ग्राहकांचे जुने मीटर बदलून त्याऐवजी स्मार्ट मीटर लावल्या जात असल्याने स्मार्ट मीटर लावणे बंद करा, वीज ग्राहकांना मनमानी पद्धतीने मे महिन्यात 250 युनिटचे बिल कोणत्या आधारावर दिले याची उच्चतरीय चौकशी करण्यात यावी, वीज ग्राहकांचे वाढीव विज बिल तात्काळ कमी करण्यात याव, ढाणकी शहरातील विद्युत वाहिनीचे विद्युत खांब, व डीपीचे तात्काळ मेंटेनन्स करण्यात यावं, या अगोदर शहरात कंत्राटदारा मार्फत मेंटनस चे काम कुठे कुठे करण्यात आले याची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कार्यवाही करण्यात यावी, मुख्यालयात हजर न राहणाऱ्या सहाय्यक अभियंता नाखले व इतर अधिकारी कर्मचारी यांची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात यावी, या मागण्या निवेदनात नमूद करण्यात आल्याआहेत . या मोर्चाचे रुपांतर यावेळी सभेत झाले यामध्ये सभेला

कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती बाळासाहेब चंद्रे पाटील, नगरपंचायतचे उपाध्यक्ष दत्त दिगंबर वानखेडे, मनसे तालुकाध्यक्ष शेख सादिक, आझाद समाज पक्षाचे जिल्हाध्यक्ष जॉन्टी विनकरे , भाजपा शहराध्यक्ष नगरसेवक बाळू योगेवार , शिवसेना उबाठा चे शहराध्यक्ष कांता वासमवार, माजी जि प सदस्य रामराव गायकवाड, माजी जि. प .सदस्य रमेश गायकवाड, प्रहार तालुका अध्यक्ष सय्यद माजीद, काँग्रेस शहराध्यक्ष गजानन मिटकरे, युवा सेना तालुका अध्यक्ष संभाजी गोरटकर , माजी उपनगराध्यक्ष जाहीर भाई, खरेदी विक्री संघाचे गणेश नरवाडे, वंचित बहुजन आघाडीचे तालुका अध्यक्ष संबोधी गायकवाड, राष्ट्रवादीचे संतोष मंतेवाड, व्यापारी आघाडीचे रुपेश भंडारी, शेख बशीर, प्रशांत जोशी, मुकुंद जोशी, किशोर ठाकूर, बाबुराव नरवाडे सय्यद खालिद, तय्यब सर यांनी संबोधित केले .यावेळीठाणेदार पांडुरंग शिंदे, जमादार अभिषेक इंगळे, रोशन सरनाईक, मोहन चाटे, संतोष चव्हाण, राहुल सोळंके, सतीश परतके प्रकाश मुंढे शरद चव्हाण, सुदर्शन जाधव, हिम्मत जाधव, प्रवीण जाधव, अंबादास गारोळे, राजू बेलेवार पोउपनी राठोड जमादार रवी गीते उपविभाग उमरखेड पोउपनी वानोळे पोलीस स्टेशन उमरखेड, दराटी, पोफाळी येथील अंमलदार व RCP पथक चे अंमलदार हजर होते यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता .

### मोर्चामध्ये महिलेचा आक्रोश !

■ या मोर्चामध्ये एका महिलेने स्मार्ट मिटर लावल्यानंतर तिन हजार रुपयाचे बिल आले असून मजूरी करून कुटुंबाचा गाडा चालवित असल्याचे सांगून नवरा आंधळा आहे अशात हजारों रुपयाचे बिल कूठून भरू म्हणून अक्षरशः मोर्चात टाहो फोडला .

■ ढाणकी शहरात लावण्यात आलेले मिटर हे स्मार्ट मिटर नसून ' चिटर ' मिटर आहे. ज्यांना ४०० रुपये बिल येत होते त्यांना ४ हजार रुपये देण्यात आले आहे. यामुळे महावितरणने कॅम्प लावून आमच्याकडे वाढिव बिले जमा केलेल्या १५० लोकांचे बिल कमी करून द्यावे तसेच वाढीव बिले देणाऱ्या कंत्राटदाराची हकालपट्टी करावी .
- बाळासाहेब चन्द्रे पाटील
माजी कृउबास सभापती उमरखेड .

■ मागील महिनाभरापासून स्मार्ट मिटर विरोधात विज वितरण कंपनीला निवेदने देवुन कळविण्यात आले होते मात्र गेंड्याची कातडी पांघरलेल्या प्रशासनाने दखल घेतली नसल्याने आज हा भव्य मोर्चा तसेच कडकडीत बंद पाळून रास्ता रोको करण्यात आला . जर स्मार्ट मिटर ची सक्ती केली तर शहरातील सर्व स्मार्ट मिटर काढून महावितरण कार्यालयासमोर मिटरची होळी करू आता नागरिकांची सहनशिलता संपत आहे . असे झाल्यास वावगे ठरणार नाही असा इशाराच महावितरणने समजावा .
- सादिक शेखमनसे तालूका अध्यक्ष / उमरखेड .

■ आमच्या आजच्या मोर्चातील ५ मागण्या ह्या पूर्ण करण्याचे आश्वासन कार्यकारी अभियंता चव्हाण यांनी मान्य केल्या असून या आश्वासनाची पुर्तता न झाल्यास यापूढील आंदोलन हे पुसद येथे कार्यकारी अभियंता ( विजवितरण ) कार्यालया समोर करणार -
-जॉन्टी विणकरे आझाद समाज पार्टी जिल्हा अध्यक्ष यवतमाळ .

## दोन ठिकाणच्या बैल चोरीचा पर्दाफाश; 6 आरोपी अटकेत,

**▸विदर्भ केसरी। पांढरकवडा**



केळापूर तालुक्यातील दोन वेगवेगळ्या ठिकाणी घडलेल्या बैल चोरीच्या गुन्ह्यांचा पांढरकवडा पोलिसांनी यशस्वी उलगडा करत सहा आरोपींना अटक केली आहे. चोरीतील बैल कत्तलीसाठी विकल्याचे तपासात निष्पन्न झाले असून, आरोपींकडून रोख रक्कम, गुन्ह्यात वापरलेली वाहने, मोबाईल असा एकूण १० लाख ५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ७ जून २०२६ रोजी अयुबखान वासिनखान मनीयार (रा. सरदार पटेल वॉर्ड, पांढरकवडा) यांच्या मांगुर्डा शिवारातील गोठ्यातून दोन बैल (किंमत ४० हजार रुपये) चोरीला गेल्याची तक्रार दाखल झाली होती. त्यानुसार पांढरकवडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर ८ जुलै २०२६ रोजी घनमोड शिवारातून स्वप्नील अन्नाजी ठाकरे (रा. बोरगाव कडू) यांच्या गोठ्यातील दोन बैल (किंमत ५० हजार रुपये) चोरीला गेल्याची दुसरी घटना घडली. या प्रकरणीही गुन्हा नोंदवून तपास सुरू करण्यात आला.

पोलीस निरीक्षक एल. डी. तावरे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाने गोपनीय माहिती व तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपींचा शोध घेतला. तपासादरम्यान दोन्ही गुन्ह्यांतील एकूण सहा आरोपींना अटक करण्यात आली. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये राकेश देविदास चौधरी, ध्रुप अतुल ठमके, सय्यद आकीब सय्यद अकबर खान, शाहरुख खान, अभिषेक विजय मडावी आणि अभय ऊर्फ दुर्लभ जयपाल मिश्रा (सर्व रा. पांढरकवडा) यांचा समावेश आहे. तसेच चोरीचे बैल कत्तलीसाठी विकत घेतल्याप्रकरणी शफी मुदस्सीर (रा. आदिलाबाद) यालाही आरोपी करण्यात आले आहे.

पोलीस कोठडीतील चौकशीत आरोपींनी चोरी केलेले बैल कत्तलीसाठी विकल्याची कबुली दिली. त्यामुळे चोरीस गेलेल्या बैलांच्या बदल्यातील ९० हजार रुपयांची रोख रक्कम आरोपींकडून जप्त करण्यात आली. याशिवाय गुन्ह्यात वापरलेली एक मोटारसायकल (४५ हजार रुपये), दोन चारचाकी वाहने (८.५० लाख रुपये) आणि पाच मोबाईल फोन (१.१० लाख रुपये) असा एकूण १० लाख ५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात आणि सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी रॉबीन बन्सल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक एल. डी. तावरे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने केली. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर पेंढारकर व त्यांच्या सहकाऱ्यांकडून सुरू आहे.

## लाचखोर शाखा अभियंत्याला एक दिवसाची पोलिस कोठडी

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**

जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग क्रमांक १ मधील कंत्राटदाराकडून १० हजार रुपयांची लाच घेताना रंगेहाथ अटक करण्यात आलेले शाखा अभियंता मधुसुदन ताजणे यांना आज स्थानिक न्यायालयाने एक दिवसाची पोलिस कोठडी सुनावली आहे. काल (१५ जुलै २०२६) लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (ACB) यवतमाळने केलेल्या धडक कारवाईनंतर आज आरोपीला न्यायालयात हजर करण्यात आले होते.

शाखा अभियंता मधुसुदन ताजणे यांना आज, रोजी यवतमाळच्या विशेष न्यायालयात हजर करण्यात आले. सरकारी पक्षाच्या वतीने न्यायालयात जोरदार युक्तिवाद करण्यात आला आरोपीने मोजमाप पुस्तिकेवर (M.B.) सही करण्यासाठी आणि पूर्णत्व प्रमाणपत्र (CC) देण्यासाठी तक्रारदाराकडे सुरुवातीला २५,००० रुपयांची मागणी केली होती, ज्याची तडजोड १०,००० रुपयांवर झाली या लाच प्रकरणाची पाळेमुळे किती खोलवर पसरली आहेत आणि यात इतर कोणचा किंवा कर्मचाऱ्यांचा सहभाग आहे का, हे देखील तपासणार आहे. सदर प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपअधीक्षक अभय आष्टेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक मनोज ओरके आणि त्यांचे सहकारी करत आहेत.

## दिग्रस येथील रामदास आठवले मागासवर्गीय सह.सूतगिरणी चा धागा सातासमुद्रापार.

**▸विदर्भ केसरी। किशोर की. कांबळे**

दिग्रस : विदर्भातील इतिहास पाहता बऱ्याच सूतगिरण्या पंजीबद्ध होऊन ही उत्पादनाखाली आल्या नाही परंतु दिग्रस येथील रामदास आठवले मागासवर्गीय सहकारी सूतगिरणी ही 2019 मध्ये पंजिबद्ध होऊन 2025 मध्ये उत्पादनाखाली आलेली आहे आणि अल्पावधीतच उत्कृष्ट दर्जाचे सूत तयार करणारी अव्वल दर्जाची गिरणी ठरली आहे गिरणी च्या उत्कृष्ट धाग्याच्या गुणवत्तेमुळे दिग्रस गिरणीतील निघालेला धागा आज थेट चायना च्या बाजारपेठेत जहाजाच्या मार्गे रवाना झाला.


रामदास आठवले मागासवर्गीय कापूस उत्पादक सहकारी सूतगिरणी चे भूमिपूजन 6 डिसेंबर 2019 ला झाले होते परंतु मध्यंतरी आलेल्या कोरोनाच्या कठीण काळातील संकटात सूतगिरणी च्या कामाला ब्रेक लागला होता परंतु अशाही परिस्थितीमध्ये सुतगिरणीचे काम चालू ठेवून आणि अवघ्या चार वर्षा मध्ये सूतगिरणी उत्पादनाखाली आली आणि मागील दहा वर्षांमध्ये महाराष्ट्रातील पणजीबद्ध असलेल्या सूतगिरणी पैकी उत्पादनाखाली आलेली ही एकमेव सूतगिरणी आहे, अभिमानाची गोष्ट म्हणजे सूतगिरणी चा धागा हा थेट विदेशात पोहोचला आहे, यवतमाळ पांढऱ्या सोन्याचा जिल्हा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कापसाचा धागा हा उच्च प्रतीचा असतो हे पुन्हा सिद्ध झाले आहे आणि हा उच्च प्रतीचा धागा तयार करण्यासाठी सर्व संचालक मंडळाचे सहकार्य, मॅनेजिंग डायरेक्टर बी एल बेहरा आणि त्यांच्या सर्व टीमचे उत्कृष्ट कार्य आणि सूतगिरणी मधील ऑटोमॅटिक मशीन,एक्सपर्ट टीम, स्वतःचीच सूतगिरणी समजून काम करणारा कामगार, सर्व स्टाफ यांच्या मुळेच हे शक्य झाले आहे तसेच राज्याचे मुख्यमंत्री माननीय देवेंद्रजी फडणवीस,केंद्रीय मंत्री रामदासजी आठवले साहेब व यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री संजय भाऊ राठोड यांच्या सहकार्यामुळे सूतगिरणीची उभारणी होऊन गिरणी उत्पादनाखाली आली अशी प्रतिक्रिया रामदास आठवले मागासवर्गीय सूतगिरणीचे अध्यक्ष महेंद्र मानकर यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केली.

मागील 18 महिन्याच्या कार्यकाळात जवळपास साडेपाच हजार टन सुताचे उत्पादन झाले आहे विशेष म्हणजे आपल्या सूतगिरणीला 25000 चात्यांची मान्यता आहे परंतु सद्यस्थितीत सोळाहजार पाचशे चाते चालू आहेत दररोज दहा ते बारा टन सूत उत्पादित केल्या जाते या सूतगिरणी मध्ये दोन शिफ्ट मधून जवळपास 200 च्या वर कर्मचारी काम करत आहेत आणि येणाऱ्या काळात लवकरच 25 हजार चाते पूर्ण पणे चालू होतील आणि शेकडो लोकांना रोजगार मिळेल विशेष म्हणजे चायनातील स्पेशल टीमच्या माध्यमातून आपल्या सूतगिरणीतील उत्पादित होणाऱ्या धाग्याचे परीक्षण झाले वेगवेगळ्या चाचण्या झाल्या त्यातून पूर्णतः चाचण्या यशस्वी झाल्या नंतरच चायनाच्या बाजारपेठेने आपला धाग्याची उत्कृष्ट गुणवत्ता पाहूनच आपल्या धाग्याला मान्यता दिली आणि त्यामुळेच सूतगिरणीतील सुत हे आज विदेशात रवाना झाले आहे आणि अजून वेगवेगळे देशांची धाग्याला मागणी आहे ही आपल्यासाठी व दिग्रस करांसाठी अतिशय आनंदाची बाब आहे असे पत्रकारांशी बोलताना संस्थापक अध्यक्ष मिलिंद मानकर यांनी सांगितले. यावेळी सूतगिरणीचे संचालक प्राध्यापक मधुकर वाघमारे,अविनाश कुलदीपके,धर्मराज गायकवाड गिरणीचे जनरल मॅनेजर एल आर बेहरा, श्रेयश मानकर व इतर सर्व कर्मचारी व कामगार उपस्थित होते.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची चरण पादुका पालखी २१ जुलैला पुसदमध्ये

### गुरुदेव सेवा मंडळाकडून स्वागताची जय्यत तयारी!

**▸विदर्भ केसरी। पुसद प्रतिनिधी विजय निखाते**



पुसद : संत परंपरा केवळ भक्तीची नसून सेवा, समर्पण आणि समाजाला एकत्र आणण्याचीदेखील शक्ती आहे. याच भावनेतून दरवर्षी प्रमाणे यंदाही आषाढी एकादशीनिमित्त मानवतेचे महान पुजारी, ग्रामगीता निर्माते वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या चरण पादुकांसह पंढरपूर प्रचार यात्रा २१ जुलैला सकाळी १० वाजता पुसदमध्ये दाखल होत आहे. या पालखी सोहळ्याच्या स्वागतासाठी गुरुदेव सेवा मंडळ, पुसद तालुका शाखा आणि सर्व गुरुदेव अनुयायी सज्ज झाले आहेत.

अमरावती जिल्ह्यातील गुरूकुंज आश्रम, मोझरी येथून निघालेली राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची चरण पादुका पालखी केंद्रीय प्रचार विभागाचे प्रचार प्रमुख तथा पालखी संयोजक गोपाल कडू, सचिव तथा पालखी व्यवस्थापक डॉ ज्ञानेश्वर मुडे यांच्या मार्गदर्शनाखाली आषाढी एकादशीनिमित्त श्रीक्षेत्र पंढरपूर वारीकरिता महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातून मार्गस्थ होत आहे. सोबत भजन संच ध्यान, प्रार्थना, कीर्तन, भजन, प्रवचन व वाड्. मयाद्वारे महाराजांचे विचार जनसामान्यांपर्यंत पोहोचविणे, हेच पालखी प्रचार यात्रेचे उद्दीष्ट आहे.

**■ २१ जुलै रोजी पालखीचे आगमन**

पुसद शहरामध्ये राष्ट्रसंतांची चरण पादुका पालखीचे आगमन, स्वागत, दर्शन, मार्गदर्शन व महाप्रसादाची परंपरा वर्षानुवर्षे अखंडपणे सुरू आहे. यंदा २१ जुलै रोजी सकाळी १० वाजता स्थानिक विरंगुळा केंद्र सभागृहात पालखीचे स्वागत राज्यमंत्री इंद्रनील नाईक व नगराध्यक्ष ॲड मोहिनी नाईक हस्ते आयोजित आहे. पुसद शहर व तालुक्यातील गुरुदेव अनुयायांनी दर्शनाचा लाभ घेण्याचे विनंती गुरुदेव सेवा मंडळाचे तालुकाध्यक्ष प्रा प्रकाश लामणे, उपाध्यक्ष प्रा नंदकुमार खैरे, सचिव ॲड गजानन साखरे, कोषाध्यक्ष ज्ञानेश्वर सुरडकर, प्रचार प्रमुख राजेंद्र काळबांडे, भजन प्रमुख माधवराव जाधव, यशवंत देशमुख, नंदकुमार पंडित, मनोहर बनस्कर, ज्ञानेश्वर ताकतोडे, प्रमोद जयस्वाल, शरद राऊत, विठ्ठल येवले, बाबासाहेब वाघमारे, राजू पुरी, महिला प्रतिनिधी छाया प्रकाश लामणे, संध्या पवार, माधुरी वांझाळ, शीला जाधव, जया मोरे, आदींनी केली आहे.

## आशा सेविका व गटप्रवर्तकांचा वाशिममध्ये मोर्चा



**▸विदर्भ केसरी। वाशिम :**

आरोग्य खाते आशा व गटप्रवर्तक संघटना, महाराष्ट्र राज्य (आयटक) यांच्या वतीने आशा सेविका व गटप्रवर्तकांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी बुधवारी (१५ जुलै) वाशिम येथे जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. यानंतर मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी जेलभरो आंदोलनही करण्यात आले. आशा सेविका व गटप्रवर्तक या राष्ट्रीय आरोग्य अभियानाचा महत्त्वाचा घटक असून, नियमित आरोग्य सेवा, लसीकरण, कुपोषण निर्मूलन, संसर्गजन्य रोग नियंत्रण, माता-बाल आरोग्य सेवा आदी विविध जबाबदाऱ्या त्या पार पाडत असल्याचे संघटनेने नमूद केले. संघटनेने आशा सेविका व गटप्रवर्तकांना निवडणूक (बीएलओ) कामकाजातून मुक्त करावे, मोबदल्याशिवाय अतिरिक्त कामे देऊ नयेत, दहा वर्षांपेक्षा अधिक सेवा केलेल्या गटप्रवर्तकांना कायमस्वरूपी सेवेत सामावून घ्यावे, तसेच आशा सेविकांना किमान ₹ २६,००० आणि गटप्रवर्तकांना ₹ ३४,००० मासिक मानधन देण्यात यावे, अशी प्रमुख मागणी केली. याशिवाय ग्राम आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समितीच्या सचिवपदासंदर्भातील अडचणी दूर कराव्यात आणि वाढत्या कामाच्या ताणाचा विचार करून शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशीही मागणी करण्यात आली. मागण्यांबाबत त्वरित निर्णय घेऊन त्या पूर्ण कराव्यात, या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून जेलभरो आंदोलन करण्यात आल्याचे संघटनेच्या वतीने सांगण्यात आले. या आंदोलनात राज्य उपाध्यक्ष कॉ. मुगाजी बुरुड, जिल्हाध्यक्ष हर्षा खडसे, जिल्हा कार्याध्यक्ष वंदना हिरवाळे यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी तसेच मोठ्या संख्येने आशा सेविका व गटप्रवर्तक सहभागी झाले



महत्त्वाचे



## कृषि उपसंचालक हिना शेख यांची मेडशीला भेट फॉर्मर ग्रुप लीग विषयी शेतकऱ्याना मार्गदर्शन

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी**

वाशिम : जिल्ह्यात कृषी क्षेत्रात सामूहिक शेतीला चालना देण्यासाठी आणि शेतकऱ्यांचे आर्थिक सक्षमीकरण करण्यासाठी 'फार्मर ग्रुप लीग ही एक अभिनव स्पर्धा सुरू करण्यात आली.या स्पर्धेचे मुख्य उद्दिष्ट वैयक्तिक शेती करण्यापेक्षा शेतकऱ्यांनी एकत्र येऊन सामूहिक शेती करावी, आधुनिक तंत्रज्ञान, डिजिटल शेती आणि सेंद्रिय शेतीचा वापर करावा, यासाठी या उपक्रमाची सुरुवात झाली आहे.ही स्पर्धा वाशिम जिल्हा कृषी विभाग आणि 'आत्मा' यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत आहे. याचे फायदे आणि महत्त्व असे आहे की शेतकरी एकत्र आल्याने त्यांची बाजारात होणारी आर्थिक पिळवणूक व फसवणूक थांबण्यास मदत होते.या स्पर्धात्मक वातावरणामुळे विविध शासकीय योजना शेतकरी कंपन्या व गटांपर्यंत थेट पोहोचवणे सोपे होते.शेतकऱ्यांना एकमेकांच्या अनुभवातून शिकण्याची आणि आधुनिक शेती तंत्र आत्मसात करण्याची संधी मिळते.आज मालेगाव दौऱ्यावर असताना वाशिम कृषी उपसंचालक हिना शेख यांनी मेडशी या गावाला भेट देत शेताच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांना फार्मर ग्रुप लीग विषयी मार्गदर्शन करत काही सूचना दिल्या.यावर्षी अल निनोचा प्रादुर्भाव पाहता शेतकऱ्यांनी पीक व्यवस्थापन कसे करावे शेतामध्ये कामगंध सापळे, पक्षी थांबे,दशपर्णी अर्क,निंबोळी अर्क बनवून त्याचा उपयोग केल्यास शेतातील देखभाल खर्च कमी होऊन उत्पन्न वाढेल तसेच जमिनीची पोत सुद्धा सुधारेल या विषयी सखोल माहिती दिली.या वेळी मंडळ कृषी अधिकारी अमोल तांबे,प्राजक्ता कुचेकर सह गोरखनाथ भागवत,सचिन साठे, योगेश घुगे, अजिंक्य मेडशीकर यांची उपस्थिती होती

# मेळघाटातील अतिदुर्गम भागात ८ वर्षांनंतर धावली लालपरी

## आमदार केवलराम काळे यांच्या पाठपुराव्याला यश

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी**

परतवाडा : मेळघाटातील अतिदुर्गम रायपूर, हतरू, रुईपाठार आणि काजलडोह परिसरातील नागरिकांची तब्बल आठ वर्षांपासूनची प्रलंबित मागणी अखेर पूर्ण झाली आहे. आमदार केवलराम काळे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे बंद असलेली महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची (एस. टी.) बस सेवा पुन्हा सुरू करण्यात आली. आज परतवाडा आगार येथे आयोजित कार्यक्रमात बससेवांना हिरवी झेंडी दाखवून शुभारंभ करण्यात आला.

याअंतर्गत परतवाडा–सेमाडोह मार्गे रायपूर–हतरू–रुईपाठार तसेच परतवाडा–सेमाडोह मार्गे रायपूर–हतरू–काजलडोह या दोन बससेवा सुरू करण्यात आल्या. मेळघाटातील अतिदुर्गम भागातील नागरिकांसाठी ही बससेवा अत्यंत महत्त्वाची ठरणार असून, विद्यार्थी, रुग्ण, शेतकरी, महिला, कामगार आणि सर्वसामान्य नागरिकांना शिक्षण, आरोग्य सेवा, शासकीय कामकाज आणि बाजारपेठेशी संपर्क साधणे आता अधिक सुलभ होणार आहे. कार्यक्रमादरम्यान पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत परतवाडा आगार परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी गजानन कोल्हे, अचलपूर तालुकाध्यक्ष समीर हावरे, चिखलदरा तालुकाध्यक्ष आलोक अलोकर, दिनेश चव्हाण, भैय्यालाल मावस्कर, विजय मांडले, श्रीराम आठवले, अभिषेक राठोड, शैलेश म्हला, यशवंत काळे, संदीप पाचघरे, नितेश राठोर, अमोल जाधव, नितीन चावरे, अविनाश यावले, आगार प्रमुख वासनिक मॅडम, वाहक, चालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अधिकारी-कर्मचारी तसेच पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी आमदार केवलराम काळे म्हणाले, “मेळघाटातील दुर्गम व अतिदुर्गम भागातील नागरिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी मी कायम प्रयत्नशील आहे. ही बससेवा सुरू झाल्याने हजारो नागरिकांचा प्रवास सुलभ होणार असून, मेळघाटाच्या सर्वांगीण विकासासाठी माझा पाठपुरावा यापुढेही अविरत सुरू राहील.”




## प्रेमसंबंधांतून सुरजागड कंपनीच्या स्टॉकयार्डमध्ये कार्यरत युवतीची गळफास लावून आत्महत्या..!

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**

अहेरी : चामोर्शी तालुक्यातील रहिवासी व सध्या आलापल्ली येथे भाड्याच्या खोलीत राहून सुरजागड कंपनीच्या खमनचेरू स्टॉकयार्डमध्ये डाटा एन्ट्री ऑपरेटर ची नोकरी करणाऱ्या एका २६ वर्षीय युवतीने गळफास लावून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. ही घटना बुधवार, १५ जुलै रोजी रात्रीच्या सुमारास मौजा आलापल्ली येथे घडली. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.स्नेहा हिवराज कुमरे (वय २६, रा. मार्कडा, ता. चामोर्शी, ह.मु. आलापल्ली) असे मृत युवतीचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मृत स्नेहा कुमरे ही खमनचेरू येथील सुरजागड कंपनीच्या स्टॉकयार्डमध्ये कार्यरत होती. तिचे मागील तीन महिन्यांपासून तिथेच पोकलेन चालक म्हणून काम करणाऱ्या राहुल रंगाराव घरात (वय २७, रा. चंद्रपूर) याच्यासोबत प्रेमसंबंध होते. या दोघांच्याही नातेवाईकांनी त्यांच्या प्रेमसंबंधाला होकार देत, रीतीरिवाजाप्रमाणे लग्न लावून देण्याचे ठरवले होते. सर्व काही सुरळीत सुरू असतानाच स्नेहाने हे टोकाचे पाऊल का उचलले, याचे कारण अद्याप समजू शकलेले नाही.



### ठाण्यात 'मर्ग' दाखल

▪ या प्रकरणी मृत स्नेहाची आई शिला हिवराज कुमरे (वय ५३, रा. मार्कडा, ता. चामोर्शी) यांच्या तोंडी रिपोर्टवरून आणि उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेल्या मेमोच्या (MLC) आधारे अहेरी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू खबरी क्रमांक ३१/२०२६, कलम १९४ बी.एन.एस.एस. (BNSS 2023) अन्वये मर्ग दाखल करण्यात आला आहे.अहेरी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी तथा पोलीस निरीक्षक हर्षल ऐकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक दिनेश येवले आणि महिला पोलीस नाईक मनिषा मुलकवार पुढील तपास करीत आहेत.

### घरमालकिणीच्या फोननंतर घटना उघडकीस

▪ बुधवार, दिनांक १५ जुलै रोजी रात्री १०:४० वाजताच्या सुमारास स्नेहा राहत असलेल्या खोलीच्या घरमालकिणीने तिच्या आईला (फिर्यादी शिला हिवराज कुमरे) फोन करून माहिती दिली की, स्नेहाने खोलीतील सिलिंग फॅनला ओढणीच्या सहाय्याने गळफास घेतला आहे. या घटनेची माहिती मिळताच आई व नातेवाईकांनी तातडीने आलापल्ली गाठले. घटनास्थळी अहेरी पोलीस आणि नातेवाईकांच्या मदतीने स्नेहाला खाली उतरवून तात्काळ उपजिल्हा रुग्णालय येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीअंती गुरुवारी (१६ जुलै) पहाटे १:०० वाजता तिला मृत घोषित केले.

## आरमोरी पोलीस हफ्तेखोर असल्याचा ग्रामस्थांचा आरोप

### मौशिखांब गावात विदेशी व गावठी दारूचा महापूर, दारूबंदी ठराव निष्प्रभ

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : मंगेश सहारे**

मौशिखांब : आरमोरी पोलीस स्टेशनच्या हद्दीतील मौशिखांब गावात विदेशी व गावठी दारूची अवैध विक्री मोठ्या प्रमाणात सुरू असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे. गावातील अनेक ठिकाणी दिवस-रात्र खुलेआम दारूची विक्री होत असल्याने सामाजिक वातावरण बिघडत असून, युवकांसह अल्पवयीन मुलांमध्ये व्यसनाचे प्रमाण वाढत असल्याची गंभीर चिंता नागरिक व महिलांनी व्यक्त केली आहे. गावातील महिलांनी एक वर्षापूर्वी मोठ्या संघर्षानंतर ग्रामसभेत दारूबंदीचा ठराव मंजूर करून घेतला होता. मात्र आजही गावात विदेशी व गावठी दारूची विक्री सुरूच असल्याने हा ठराव केवळ कागदावरच राहिल्याची भावना महिलांमध्ये आहे. दारूबंदीची प्रभावी अंमलबजावणी न झाल्यामुळे महिलांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, अवैध दारू विक्रीमुळे अनेक कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त होत आहेत. घरगुती वाद, आर्थिक अडचणी, महिलांवरील मानसिक ताण आणि तरुण पिढी व्यसनाच्या विळख्यात अडकण्याचे प्रमाण वाढत असल्याचे चित्र आहे. विशेष म्हणजे काही अल्पवयीन मुलेही या व्यसनाच्या आहारी जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. काही नागरिकांनी असा आरोप केला आहे की, गावात अवैध दारू विकणाऱ्यांवर कारवाई होत नसून त्यांना पोलिसांचे पाठबळ मिळत आहे. आरमोरी पोलीस हफ्तेखोर असल्याचा थेट आरोपही काही ग्रामस्थांनी केला असून, पोलीस प्रशासन



हप्ते घेऊन या प्रकाराकडे दुर्लक्ष करत असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. या आरोपांची स्वतंत्रपणे पुष्टी झालेली नाही. महिलांचे म्हणणे आहे की, अनेक वेळा संबंधित विभागाकडे तक्रारी करूनही ठोस कारवाई होत नसल्याने दारू विक्रेत्यांचे मनोबल वाढले आहे. परिणामी गावातील शांतता, सामाजिक ऐक्य आणि तरुणांचे भविष्य धोक्यात आले आहे. ग्रामस्थांनी जिल्हा पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी व आरमोरी पोलीस स्टेशनच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून अवैध दारू विक्रेत्यांवर कठोर कारवाई करावी, दारूबंदी ठरावाची प्रभावी अंमलबजावणी करावी आणि गावाला व्यसनमुक्त करण्यासाठी विशेष मोहीम राबवावी, अशी जोरदार मागणी केली आहे. आता प्रशासन या गंभीर आरोपांची दखल घेऊन प्रत्यक्ष कारवाई करते की नाही, याकडे मौशिखांबसह परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## सात बहिणी डोंगरावर पर्यटकांची गर्दी वाढली

### सुरक्षेअभावी अपघाताची भीती..!

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**

चंद्रपूर : सध्या प्रसिद्ध घोडाझरी पर्यटनस्थळ बंद असल्याने साहसी पर्यटकांचा ओढा नागभीडजवळील सात बहिणी सेव्हन सिस्टर्स हिल डोंगराकडे मोठ्या प्रमाणात वाढला आहे. मात्र, या डोंगराची दुर्गम, उंच आणि खडकाळ रचना लक्षात घेता येथे पर्यटकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. पर्यटनस्थळी कोणतीही शासकीय सुरक्षा व्यवस्था नसल्याने भविष्यात मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, तातडीने सुरक्षा उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

हिरवाईने नटलेले जंगल, ट्रेकिंगसाठी असलेल्या खडकाळ वाटा, दगडात कोरलेल्या पायऱ्या आणि नैसर्गिक गुहा यामुळे सात बहिणी डोंगर पर्यटकांचे प्रमुख आकर्षण बनले आहे. वर्षभर येथे पर्यटकांची वर्दळ असते. विशेषतः शनिवार आणि रविवारच्या सुटीच्या दिवशी पर्यटकांची मोठी गर्दी उसळते. मात्र, या ठिकाणी भेट देणारे काही पर्यटक सुरक्षेकडे दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येत आहे. डोंगराचा बहुतांश भाग खडकाळ असून, पावसाळ्यात खडकांवर शेवाळ आणि ओलावा निर्माण झाल्याने परिसर निसरडा होतो. अशा धोकादायक परिस्थितीत अनेक हौशी पर्यटक खोल दरीच्या कड्यावर उभे राहून मोबाइलवर रील्स तयार करणे, सेल्फी काढणे आणि थरारक छायाचित्रे टिपण्याच्या प्रयत्नात दिसतात. फोटो किंवा व्हिडीओच्या नादात पाय घसरून अथवा तोल जाऊन पर्यटक खोल दरीत कोसळण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी प्रशासनाने तातडीने लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे.

शनिवार, रविवार तसेच शासकीय सुटीच्या दिवशी येथे होणारी गर्दी लक्षात घेता संबंधित प्रशासन किंवा वन विभागाने या ठिकाणी सुरक्षा रक्षक तैनात करावेत, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे. याशिवाय, धोकादायक कड्यांच्या ठिकाणी पर्यटकांना जाण्यापासून रोखण्यासाठी तात्पुरते संरक्षक कठडे बॅरिकेड्स उभारावेत, धोक्याची सूचना देणारे फलक लावावेत तसेच जीव धोक्यात घालून स्टंट करणाऱ्या आणि रील्स बनविणाऱ्या पर्यटकांवर जागेवरच दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणीही होत आहे.

नागभीड परिसरातील सात बहिणी डोंगराला नैसर्गिक सौंदर्यासोबतच पौराणिक महत्त्वही आहे. स्थानिक आख्यायिकेनुसार या डोंगरावर पूर्वी अंबाई, निंबाई, उमाई, गौराई, मुक्ताई, पवराई आणि भिवराई या सात बहिणींचे वास्तव्य होते. त्यामुळे या डोंगराला सात बहिणींचा डोंगर म्हणून ओळखले जाते.

▪ डोंगरावरील खडकाळ रचना, दगडात कोरलेल्या पायऱ्या, छोट्या नैसर्गिक गुहा आणि साहसी चढाईचा अनुभव हे ट्रेकर्ससाठी विशेष आकर्षण आहे. डोंगराच्या सर्वोच्च शिखरावर पोहोचल्यानंतर आजूबाजूचा हिरवागार, निसर्गरम्य परिसर आणि विहंगम दृश्य पर्यटकांना मंत्रमुग्ध करते. नैसर्गिक पर्यटनस्थळ म्हणून वेगाने लोकप्रिय होत असलेल्या या ठिकाणी पर्यटकांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी प्रशासनाने योग्य नियोजन करून आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## चिमुरडीची दगडाने ठेचून निर्घृण हत्या, शेतातील घरामध्ये विवस्त्र अवस्थेत आढळला मृतदेह

**वर्धा :** जिल्ह्यातून एक अत्यंत संतापजनक घटना समोर आली आहे. सावंगी पोलिस ठाण्याच्या हद्दीत एका 12 वर्षीय चिमुरडीची दगडाने ठेचून निर्घृण हत्या करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. एका शेतातील घरात या मुलीचा विवस्त्र अवस्थेतील मृतदेह सापडल्याने, तिच्यावर अत्याचार करून तिची हत्या करण्यात आल्याचा तीव्र संशय व्यक्त केला जात आहे. या अमानुष घटनेमुळे संपूर्ण परिसरात तीव्र संतापाची लाट उसळली असून गावात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास शेतातील घरात मुलीचा मृतदेह आढळून आला. मृतदेहाची अवस्था पाहता तिच्यावर घातपात झाल्याचा संशय बळावला आहे. या घटनेची माहिती पसरताच परिसरातील 3 ते 4 गावांतील नागरिकांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली होती. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत मृतदेह ताब्यात घेतला आणि उत्तरीय तपासणीसाठी रुग्णालयात पाठवला.

### ओळखीच्या व्यक्तीने हत्या केल्याचा संशय

▪ पीडित 12 वर्षीय अल्पवयीन मुलगी नेहमीप्रमाणे सकाळी शाळेत गेली होती. दुपारी शाळा सुटल्यानंतर ती घरी परतली, मात्र त्यावेळी घरात इतर कोणीही नसून ती एकटीच होती. घरात कोणी नसल्याची हीच संधी साधून नराधम आरोपीने घरात प्रवेश करत हे कृत्य केले. संशयित आरोपी हा पीडित कुटुंबाच्या परिचयातील किंवा जवळचाच असण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.

## उत्तर उमरेड वनपरिक्षेत्रात नीलगायीची शिकार करणा-या टोळीचा पर्दाफाश

**नागपूर :** वनविभागांतर्गत येणाऱ्या उत्तर उमरेड वनपरिक्षेत्रात नीलगायीची शिकार करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करण्यात आला आहे. पोलीस आणि वनविभागाच्या संयुक्त पथकाने मौजा उटी येथे १५ जुलै २०२६ रोजी पहाटे ३ वाजता ही कारवाई केली. यात एका आरोपीला रंगेहाथ अटक करण्यात आली असून, तीन वाहने आणि शिकार केलेले मांस जप्त करण्यात आले आहे.

पहाटेच्या गस्तीदरम्यान उटी बीटमधील मौजा उटी (सर्वे क्रमांक १५०) येथील एका खाजगी शेतात संशयास्पद हालचाली आढळून आल्या. वनकर्मचारी आणि पोलीस कर्मचाऱ्यांनी तात्काळ धाड टाकून शिकार करणाऱ्या टोळीला घेरले. या कारवाईत अभिषेक उर्फ अभिशेखर पुनाराम अडोळे (वय ३८, रा. हेवती, ता. उमरेड, जि. नागपूर) याला रंगेहाथ पकडण्यात आले. इतर फरार आरोपींचा शोध पोलीस आणि वनविभागाचे पथक घेत आहे. घटनास्थळाच्या तपासणीत, शिकारी टोळीने अंदाजे ४ वर्षे वयाच्या आणि ८० किलो वजनाच्या एका नर नीलगायीची भरमार बंदुकीने गोळी घालून शिकार केल्याचे समोर आले.

# ड्रायव्हिंग लायसन्ससाठी आता डोमिसाइल अनिवार्य

## १ ऑगस्टपासून नवे नियम लागू..!

**▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**

चंद्रपूर : राज्यातील वाहन परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स) वितरण प्रक्रियेत पारदर्शकता वाढविण्यासह रस्ता सुरक्षेला अधिक बळकटी देण्यासाठी प्रादेशिक परिवहन विभाग (आरटीओ) मोठा बदल करण्याच्या तयारीत आहे. प्रस्तावित नियमांनुसार, महाराष्ट्रात नवीन ड्रायव्हिंग लायसन्स मिळविण्यासाठी अर्जदाराला महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र (डोमिसाइल सर्टिफिकेट) सादर करणे बंधनकारक केले जाण्याची शक्यता असून, ही नियमावली १ ऑगस्ट २०२६ पासून लागू होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

यासोबतच राज्यात वाढत असलेल्या बाइक टॅक्सी सेवांना शिस्त लावण्यासाठी स्वतंत्र नियमावली तयार करण्याचे कामही आरटीओ प्रशासनाकडून सुरू असल्याची माहिती मिळाली आहे. ड्रायव्हिंग लायसन्स प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणि सुरक्षितता आणण्याच्या उद्देशाने हा प्रस्ताव तयार करण्यात आला असला, तरी याबाबत राज्य शासनाचा किंवा परिवहन विभागाचा अधिकृत आदेश अद्याप प्राप्त झालेला नाही. त्यामुळे नियम लागू होण्याबाबत अंतिम निर्णय शासनाच्या अधिसूचनेनंतरच स्पष्ट होणार आहे.

चंद्रपूर जिल्ह्यात दरवर्षी शिकाऊ (लर्निंग) आणि कायमस्वरूपी (पक्के) अशा हजारो ड्रायव्हिंग लायसन्सचे वितरण केले जाते. वाहनांची संख्या वाढत असल्याने नवीन परवाना धारकांची संख्याही सातत्याने वाढत आहे. प्रस्तावित नियम लागू झाल्यास नवीन लायसन्ससाठी अर्ज करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला प्रथम डोमिसाइल प्रमाणपत्र सादर करावे लागणार आहे.


### डोमिसाइल कसे काढावे?

▪ डोमिसाइल प्रमाणपत्रासाठी नागरिकांना राज्य शासनाच्या आपले सरकार पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करता येतो. तसेच जवळच्या सेतू केंद्र किंवा महा-ई-सेवा केंद्रातूनही अर्ज करता येतो. अर्जासाठी वयाचा पुरावा (टीसी किंवा जन्मदाखला), पत्त्याचा पुरावा (रेशन कार्ड, वीज बिल, मतदार ओळखपत्र), महाराष्ट्रात १५ वर्षे वास्तव्यास असल्याचा पुरावा, आधार कार्ड, पॅन कार्ड तसेच स्वघोषणापत्र आदी कागदपत्रांची आवश्यकता असते.

डोमिसाइल किंवा अधिवास प्रमाणपत्र हा राज्य शासनाकडून दिला जाणारा अधिकृत दस्तऐवज असून, संबंधित व्यक्ती महाराष्ट्राची कायमस्वरूपी रहिवासी असल्याचे त्याद्वारे प्रमाणित केले जाते. हे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्जदाराने साधारणपणे महाराष्ट्रात किमान १५ वर्षे वास्तव्यास असल्याचा पुरावा सादर करावा लागतो. प्रस्तावित नियमांनुसार, नवीन शिकाऊ किंवा कायमस्वरूपी ड्रायव्हिंग लायसन्ससाठी अर्ज करतांना केवळ आधार कार्ड, वीज बिल किंवा इतर पत्त्याचा पुरावा पुरेसा ठरणार नाही. अर्जदार महाराष्ट्राचा अधिकृत रहिवासी असल्याचे सिद्ध करण्यासाठी डोमिसाइल प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील. यामुळे खोट्या किंवा तात्पुरत्या पत्त्यावरून ड्रायव्हिंग लायसन्स मिळविण्याच्या प्रकारांना आळा बसण्याची अपेक्षा आहे.

अनेकदा परराज्यातील व्यक्ती तात्पुरत्या पत्त्याच्या आधारे महाराष्ट्रातून वाहन परवाना मिळवित असल्याचे निदर्शनास आले आहे. अपघात किंवा गुन्हेगारीच्या घटनांमध्ये अशा व्यक्तींचा शोध घेणे तपास यंत्रणांसाठी कठीण ठरते. तसेच राज्यातील रहिवाशांची अचूक माहिती आरटीओकडे उपलब्ध राहावी आणि तपास यंत्रणांना आवश्यक माहिती सहज मिळावी, हा या प्रस्तावित बदलामागील प्रमुख उद्देश असल्याचे सांगितले जात आहे.

प्राथमिक माहितीनुसार, हा नियम केवळ नवीन ड्रायव्हिंग लायसन्ससाठी अर्ज करणाऱ्यांनाच लागू होईल. ज्यांच्याकडे आधीपासून वैध ड्रायव्हिंग लायसन्स आहे, त्यांना लायसन्स नूतनीकरण (रिन्यूअल) किंवा पत्ता बदलताना सध्या तरी डोमिसाइल प्रमाणपत्र सादर करण्याची सक्ती असणार नसल्याची माहिती समोर आली आहे.





### बाइक टॅक्सीसाठीही नवी नियमावली

▪ राज्यात बेकायदेशीरपणे सुरू असलेल्या बाइक टॅक्सी सेवांवर नियंत्रण आणण्यासाठी स्वतंत्र नियमावली तयार करण्याची प्रक्रियाही सुरू आहे. यामुळे बाइक टॅक्सी सेवा अधिक नियमनबद्ध आणि सुरक्षित करण्याचा प्रशासनाचा प्रयत्न असल्याचे समजते.

### भाडेकरूंसाठीही मार्ग खुला-

▪ भाड्याच्या घरात राहणाऱ्या किंवा स्वतःचे घर नसलेल्या नागरिकांनाही डोमिसाइल प्रमाणपत्र मिळू शकते. त्यासाठी संबंधित शहरात किंवा राज्यात किमान १५ वर्षे वास्तव्यास असल्याचे पुरावे, जसे की सलग भाडेकरार, शैक्षणिक दाखले, गॅस कनेक्शन किंवा इतर आवश्यक कागदपत्रे सादर करावी लागतील. योग्य कागदपत्रांच्या आधारे अशा नागरिकांनाही ड्रायव्हिंग लायसन्स मिळू शकणार आहे.



## महत्त्वाचे



### गडचिरोलीच्या विकासासाठी आदित्य ठाकरे यांच्या नेतृत्वात मोर्चा ; अंबादास दानवे यांची घोषणा..!

**विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**

गडचिरोली : शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने देशभर सुरू असलेल्या 'श्रीराम रक्षा आंदोलन' अभियानाच्या पार्श्वभूमीवर पक्षाचे नेते तथा विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते आमदार अंबादास दानवे यांनी गुरुवारी गडचिरोली येथे पत्रकार परिषद घेत भाजप सरकारवर जोरदार टीका केली. यावेळी त्यांनी गडचिरोली जिल्ह्याच्या विकासासाठी शिवसेना युवा नेते आमदार आदित्य ठाकरे यांच्या नेतृत्वात ऑक्टोबर किंवा नोव्हेंबर महिन्यात मोठा मोर्चा काढण्यात येणार असल्याची घोषणा केली. नागपूर येथे होणाऱ्या 'श्रीराम रक्षा आंदोलनाला' विदर्भातून मोठा जनसमर्थन मिळावे, यासाठी खासदार संजय राऊत आणि आमदार अंबादास दानवे विदर्भ दौऱ्यावर असून, त्याच अनुषंगाने ते गडचिरोली येथे आले होते. पत्रकार परिषदेत बोलतांना दानवे म्हणाले, "आज प्रभू श्रीराम आणि मंदिरांतील दानपेट्याही सुरक्षित नाहीत. याचे श्रेय भाजपने घ्यावे." अशी टीका त्यांनी केली. गडचिरोली जिल्ह्यातील वन्यजीवांचा वाढता प्रश्न, मानव-वन्यजीव संघर्ष आणि विकासाशी संबंधित विविध प्रश्न आदित्य ठाकरे स्वतः हाती घेणार असल्याचेही त्यांनी सांगितले. भाजपवर निशाणा साधतांना दानवे म्हणाले की, गडचिरोलीच्या नावावर राजकारण करण्यात आले; मात्र जिल्ह्याला अपेक्षित विकास मिळाला नाही. नैसर्गिक साधनसंपत्तीने समृद्ध असलेल्या या जिल्ह्याला न्याय मिळालेला नसून, पालकमंत्री तथा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही जिल्ह्याच्या विकासाकडे अपेक्षित लक्ष दिले नसल्याचा आरोप त्यांनी केला. या पत्रकार परिषदेला विधानसभा संपर्कप्रमुख नंदू कुमरे, जिल्हाप्रमुख पवन गेडाम, माजी जिल्हा परिषद सदस्या वेणूताई ढवगावे, हेमलता वाघाडे तसेच शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### औद्योगिक विकासासाठी जिल्हा उद्योग मित्र समितीची बैठक १७ जुलैला..!

**गडचिरोली :** गडचिरोली जिल्ह्यात औद्योगिक विकासाला गती देण्यासाठी तसेच आगामी काळात जिल्हा 'स्टील हब' म्हणून विकसित करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पावले उचलण्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर जिल्हा उद्योग केंद्र, गडचिरोली यांच्या वतीने जिल्हा उद्योग मित्र समिती व इतर समन्वय समितीची संयुक्त बैठक शुक्रवार, दि. १७ जुलै २०२६ रोजी दुपारी १.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृह येथे आयोजित करण्यात आली आहे. जिल्ह्यातील उद्योगांना चालना देणे, नवउद्योजकांना शासकीय योजनांची माहिती व मार्गदर्शन उपलब्ध करून देणे, उद्योग क्षेत्रातील अडचणी सोडविणे आणि भविष्यातील औद्योगिक विकासाचा प्रभावी रोडमॅप तयार करणे हा या बैठकीचा प्रमुख उद्देश आहे. विशेषतः गडचिरोलीमध्ये उभारणी होत असलेल्या मोठ्या औद्योगिक प्रकल्पांच्या पार्श्वभूमीवर स्थानिक उद्योगांना पूरक संधी निर्माण करणे, ॲन्सिलरी उद्योगांचा विकास आणि स्थानिक युवकांसाठी रोजगारनिर्मिती यावर बैठकीत विशेष भर दिला जाणार आहे. बैठकीत जिल्ह्यातील उद्योग क्षेत्राच्या विकासासंदर्भातील विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात येणार असून, उद्योजकांच्या अडी-अडचणी, सूचना आणि अपेक्षा जाणून घेतल्या जाणार आहेत. तसेच उद्योग उभारणीसाठी उपलब्ध असलेल्या विविध शासकीय योजना, बँक कर्ज सुविधा, औद्योगिक गुंतवणुकीच्या संधी आणि विविध विभागांमधील समन्वयातून उद्योगांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. यावेळी जिल्ह्यातील विद्यमान उद्योगांच्या समस्या व त्यावरील उपाययोजना, आगामी उद्योगविषयक कार्यक्रमांचे नियोजन, ॲन्सिलरी डेव्हलपमेंट रोडमॅप, ॲडव्हान्टेज विदर्भ अभियानाअंतर्गत उपलब्ध संधी, आजारी उद्योगांचे पुनरुज्जीवन, स्थानिक नागरिकांना रोजगार उपलब्ध करून देण्याबाबतचा आढावा तसेच जिल्हा निर्यात प्रचालन समितीची सभा यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चा होणार आहे.

# नगर परिषदेतील सत्ताधारी पक्षाने मुख्याधिका-यांशी संगनमत करून बोगस शिक्षकांची केली भरती..!

## नगरसेवक बाळू टेंभुर्णे यांचा गंभीर आरोप, गडचिरोली नगर परिषद शाळेच्या शिक्षक भरतीचे प्रकरण

**विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**

गडचिरोली : नगर पालिकेतील सत्ताधारी पक्षाच्या अध्यक्षा ॲड. प्रणोती निंबोरकर व शिक्षण समिती सभापती हर्षल गेडाम यांनी मुख्याधिका-यांशी संगनमत करून बोगस शिक्षक भरती केल्याचा आरोप करत झालेली बोगस शिक्षक भरती रद्द करण्याच्या मागणीची तक्रार नगरसेवक तथा शिक्षण समितीचे सदस्य बाळू टेंभुर्णे यांनी जिल्हाधिकारी अविश्यांत पांडा यांच्याकडे केली आहे.


बाळू टेंभुर्णे यांनी या संदर्भात जिल्हाधिका-यांची भेट घेऊन तक्रार देत सविस्तर चर्चा केली. या तक्रारीत बाळू टेंभुर्णे यांनी म्हटले आहे की, गडचिरोली नगर पालिकेत विविध विभागात काम

> सदर शिक्षक भरती प्रक्रिया ही नगर परीषदेकडून मुलाखती घेतल्या नंतर शिक्षकांची आवश्यकता असलेल्या शाळेंमधील मुख्याध्यापकांकडून ऊमेदवारांची प्रत्यक्षरीत्या चाचणी घेऊनच निवड करण्यात आली आहे.
> — **प्रणोती सागर निंबोरकर**, नगराध्यक्ष, न. प. गडचिरोली.

करण्यासाठी मनुष्यबळ पुरवठा करणारी एजंसी मे. यशश्री एंटरप्राईजेस सोलापूर यांच्याशी नगर पालिकेने ई- निवीदेद्वारे दि. २८ एप्रिल २०२६ रोजी करारनामा केलेला आहे. गडचिरोली नगर पालिकेतील काही शाळांमध्ये नववी व दहावी वर्गाकरीता व ईतरही वर्गाकरीता सदर एंजसी मार्फत कंत्राटी शिक्षक

> सदर शिक्षक भरती प्रक्रिया कंत्राटी स्वरूपाची असून, नगर परिषदेची भूमिका उमेदवारांच्या मुलाखती घेण्यापुरती मर्यादित होती. मुलाखतीनंतरचा तपशील संबंधित कंत्राटदारास कळविण्यात आला.
> —**हर्षल गेडाम**, शिक्षण समिती सभाती,

भरण्याचा ठराव दिनांक ३० जून २०२६ रोजी पार पडलेल्या मासीक सर्वसाधारण सभेत घेण्यात आला, परंतु नगराध्यक्ष व सभापती यांनी मुख्याधिका-यांशी संगनमत करून शिक्षक भरतीच्या संदर्भात सदर एजंसीला अंधारात ठेऊन काहीही पत्रव्यवहार न करता परस्पर व स्व- मर्जीने कसलिही जाहिरात न देता शासनाचे निकष व नियमांना


कार्यालय, गडचिरोली नगर पालिका, गडचिरोली
कार्यालयीन टिपणी
विभाग :- शिक्षण विभाग

डावलून दि. २९ जुन २०२६ रोजी आपापल्या ओळखीच्या व जवळच्या लोकांना बोलावून मुलाखती घेतल्या. विशेष महत्वाचे म्हणजे कंत्राटी शिक्षक भरतीचा ठराव ३० जुन रोजीचा झाला होता. पण शिक्षक भरतीच्या मुलाखती २९ जुन रोजीच घेण्यात आल्या. सत्ताधारी पक्ष सत्तेच्या धुंदित असल्यासारखे वागत असून, अशा मुजोरी करणा-या बेजबाबदार अधिकारी व पदाधिका-यांवर कारवाई करण्यात यावी. असेही या तक्रारीत म्हटले आहे.

विशेष बाब म्हणजे शिक्षक भरतीच्या मुलाखती घेण्यासाठी दस्तुरखुद्द शिक्षण समितीचे सभापती व सोबतच शिक्षण विभागाचे प्रमुख, न. प. शाळेतील दोन मुख्याध्यापक हे शासकीय पदावर काम करणारे असून, सुध्दा त्यांनी शासकीय नियमांचे पालन केलेले नाही. कुठलाही आदेश नसतांना सुद्धा सत्ताधारी व मुख्याधिका-यांच्या दबावात येऊन मुलाखती घेतल्या. व सत्ताधा-यांनी आपल्या मर्जीतील व संबंधातील १८ उमेदवारांना नियुक्ती पत्र न देता शिक्षण विभागातील कर्मचा-याद्वारे तोंडी आदेश देऊन रुजू व्हायला सांगितले. आणि १८ शिक्षकांकडे कोणतेही नियुक्ती पत्र वा पुरावा नसतांना सुद्धा ते रुजू पन झाले.

त्यामूळे ही संपूर्ण भरती प्रक्रिया नियमांना व निकषांना डावलून केली गेली असल्याने सदर शिक्षक भरती रद्द करून पारदर्शक पध्दतीने नव्याने भरती घेण्यात यावी व बेजबाबदारपणे वागणा-या मुख्याधिकारी व पदाधिकारी यांच्यावर कडक कारवाई करण्याात यावी, हयगय करणा-या मे. यशश्री कंपनीचे कंत्राट तात्काळ रद्द करण्यात यावे. असेही बाळू टेंभुर्णे जिल्हाधिका-यांशी चर्चा करतांना म्हटले आहे.

# बाळ वाचले, पण आई दगावली ; मातृप्रेमाला मुकली तीन निरागस लेकरं..!

**विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**

गडचिरोली : जिल्ह्यात कोरची तालुक्यातील दुर्गम कोसमी हे आदिवासीबहुल गावातील २७ वर्षीय अमरिका बाळाला जन्म देईल म्हणून महेश मडावीचे कुटुंबीय आनंदात होते. आरोग्य सेविका, आशा वर्कर यांची तिच्यावर देखरेख होतीच. पण,१३ जुलैच्या पहाटे घडले ते विपरीत. आदल्या रात्री ११ वाजताच्या सुमारास अमरिकाला प्रसूतीच्या वेदना सुरु झाल्या. तिला श्वास घेण्यास त्रास होऊ लागला. कुटुंबीयांनी ठरवले तिला मांत्रिकाकडे न्यायचे. त्यांनी गावापासून ३ किलोमीटर अंतरावरील मोहगाव टोला येथील पुजाऱ्याचे घर गाठले. त्याने त्याच्याकडील काय ते 'औषध' दिले




आणि नंतर सुरु झाल्या मरणवेदना.!

ही गोष्ट कळताच आशा सेविका लालेश्री काटेंगे यांनी १०८ क्रमांकाची रुग्णवाहिका बोलावून तिला कोरचीच्या ग्रामीण रुग्णालयात हलविले. प्रकृती गंभीर असल्याने डॉक्टरांनी तिला रात्रीच गडचिरोलीच्या महिला व बाल रुग्णालयात हलविले. उपचार सुरु झाले आणि पहाटे ५ वाजता अमरिकाने एका गोंडस मुलीला जन्म दिला. बाळ वाचले; पण अमरिकाने प्राण सोडला. आज तिची साडेतीन वर्षांची रिया, अडीच वर्षांचा रितेश आणि नवजात चिमुकली आईच्या मायेपासून कायमची वंचित झाली असून, त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

ही घटना प्रत्येक कुटुंबासाठी एक गंभीर इशारा आहे. गर्भवती महिलेला प्रसूतीच्या वेदना किंवा कोणताही त्रास सुरू झाल्यास विलंब न करता तातडीने जवळच्या आरोग्य केंद्रात किंवा रुग्णालयात घेऊन जा. अंधश्रद्धा किंवा अप्रमाणित उपचारांवर अवलंबून राहणे जीवघेणे ठरू शकते. एका अमरिकाचा जीव गेला.! आता दुसऱ्या कोणत्याही आईवर अशी वेळ येऊ देऊ नका. आई आणि बाळाच्या सुरक्षिततेसाठी नियमित वैद्यकीय तपासणी आणि डॉक्टरांचा सल्ला हाच सर्वात सुरक्षित मार्ग आहे.

# सेमाना-वाकडी मार्गावर टस्कर हत्तीचा मुक्तसंचार

## सलग दुस-या दिवशीही वाहतूक विस्कळीत, नागरिकांमध्ये भीती..!

**विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**

गडचिरोली : तालुक्यात गेल्या दहा दिवसांपासून रानटी हत्तींचा वावर पुन्हा वाढला असून, दोन स्वतंत्र टस्कर हत्तींच्या संचारामुळे ग्रामीण भागात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. बुधवारी दुपारच्या सुमारास सेमाना-वाकडी मार्गावर एका टस्कर हत्तीचा मुक्तसंचार पाहायला मिळाल्याने काही काळ वाहतूक पूर्णपणे प्रभावित झाली. हत्ती रस्त्यावर आल्याने दोन्ही बाजूंनी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आणि अनेक वाहनचालकांना बराच वेळ थांबून राहावे लागले.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, टस्कर हत्ती काही वेळ रस्त्यावर वावरत राहिल्याने वाहनचालकांनी सुरक्षित अंतर राखत वाहने थांबविली. त्यामुळे कोणतीही अनुचित घटना घडली नाही.



मात्र, या घटनेमुळे शेतकरी, मजूर तसेच या मार्गाने नियमित प्रवास करणाऱ्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण अधिक गडद झाले आहे. विशेष म्हणजे, मंगळवारी सायंकाळीही याच परिसरात टस्कर हत्तीचे दर्शन झाले होते. त्या वेळीही काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. सलग दुसऱ्या दिवशी हत्ती रस्त्यावर आल्याने वन विभागासमोर त्याच्या हालचालींवर नियंत्रण ठेवण्याचे मोठे आव्हान निर्माण झाले आहे.

दरम्यान, रानटी हत्तींचा मुख्य कळप सध्या आरमोरी तालुक्यातील सिर्सी-देऊळगाव जंगल परिसरात असल्याची माहिती मिळाली आहे. यापूर्वी हा कळप गुरवळा भागात असताना त्यामधून आणखी एक टस्कर भरकटल्याचे समोर आले आहे. त्यामुळे गडचिरोली तालुक्यालगतच्या परिसरात आता दोन स्वतंत्र टस्कर हत्तींचा वावर असल्याचे स्पष्ट झाले असून, त्यांचा संचार सतत बदलत असल्याने नागरिकांनी विशेष सतर्क राहण्याची गरज आहे.

हत्तींच्या वाढत्या वावरामुळे शेतपिकांचे नुकसान होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तसेच जंगलालगतच्या गावांतील नागरिकांनी रात्रीच्या वेळी अनावश्यक बाहेर पडणे टाळावे, शेतात किंवा जंगल परिसरात एकट्याने जाऊ नये आणि हत्ती दिसल्यास तत्काळ वन विभागाला माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. वन विभागाकडून हत्तींच्या हालचालींवर सातत्याने लक्ष ठेवण्यात येत असून, नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत.

# प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत ५६ लाभार्थ्यांना घरकुल बांधकाम प्रारंभ आदेश..!

**विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**

भामरागड : केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० अंतर्गत भामरागड नगरपंचायत हद्दीतील पात्र नागरिकांना घरकुलाचा लाभ देण्याच्या प्रक्रियेला गती मिळाली असून, पहिल्या टप्प्यातील ५६ पात्र लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाचा प्रारंभ आदेश प्रदान करण्यात आला आहे. या उपक्रमामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू कुटुंबांचे स्वतःच्या पक्क्या घराचे स्वप्न साकार होण्यास मोठी मदत होणार आहे.

नगरपंचायत प्रशासनाकडून योजनेअंतर्गत लाभार्थ्यांकडून ऑनलाइन अर्ज मागविण्यात आले होते. प्राप्त अर्जांची सखोल छाननी करून पात्र ठरलेल्या ५६ लाभार्थ्यांचे सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्यात आले. त्यानंतर हा प्रस्ताव मंजुरीसाठी गृहनिर्माण व शहरी विकास मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडे सादर करण्यात आला होता. या प्रस्तावाला २३ फेब्रुवारी २०२६ रोजी मंत्रालयाकडून मंजुरी मिळाल्यानंतर पात्र लाभार्थ्यांकडून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून १५ जुलै २०२६ रोजी घरकुल बांधकामाचा प्रारंभ आदेश देण्यात आला. यावेळी नगरपंचायत भामरागडचे बांधकाम सभापती तेजस्विनो मडावी तसेच आरोग्य व स्वच्छता सभापती कविता चेतमवार यांच्या हस्ते लाभार्थ्यांना प्रारंभ आदेशांचे वितरण करण्यात आले. उपस्थित लाभार्थ्यांनी शासनाच्या या महत्त्वाकांक्षी योजनेबद्दल समाधान व्यक्त करत घरकुलाचे स्वप्न साकार होत असल्याची भावना व्यक्त केली.

नगरपंचायत प्रशासनाने शहरातील पात्र व गरजू नागरिकांना प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० चा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रांसह ऑनलाइन अर्ज सादर करण्याचे आवाहन केले आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांना सुरक्षित, सन्माननीय आणि पक्के घर उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ही योजना अत्यंत महत्त्वपूर्ण ठरत असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

याबाबत माहिती देतांना मुख्याधिकारी अभिजीत सोनवणे तसेच नगराध्यक्षा राम कोमटी महाका यांनी पात्र लाभार्थ्यांनी शासनाच्या या



योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन केले. भविष्यातही पात्र नागरिकांना टप्प्याटप्प्याने या योजनेचा लाभ देण्यासाठी नगरपंचायत प्रशासन प्रयत्नशील राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### आदिवासी विद्यार्थ्यांनी आयआयएमला दिली भेट

गडचिरोली : गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यातील १८ आदिवासी विद्यार्थ्यांनी नुकतीच नागपूर येथील भारतीय व्यवस्थापन संस्थेला (आयआयएम) भेट दिली. 'जागृत' या सामाजिक संस्थेने हा विशेष शैक्षणिक अभ्यासदौरा आयोजित केला होता, ज्यात १२ विद्यार्थी आणि ६ विद्यार्थिनींचा समावेश होता. नक्षलवादी हिंसाचाराच्या छायेत बालपण घालवलेल्या या विद्यार्थ्यांनी आता जागतिक शिक्षणाचे स्वप्न पाहिले आहे.

# खरीप हंगामासाठी गडचिरोली जिल्ह्यात खतांचा मुबलक साठा

**विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**

गडचिरोली : आगामी खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर गडचिरोली जिल्ह्यात रासायनिक खतांचा पुरेसा साठा उपलब्ध असून शेतकऱ्यांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता व घाबरून न जाता आवश्यकतेनुसारच खतांची खरेदी करावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. जिल्ह्यात खतांचा पुरवठा नियमित सुरू असून आवश्यकतेनुसार आणखी खत उपलब्ध करून देण्यासाठीही कृषी विभागाकडून सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे.

जिल्हा प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, खरीप हंगामासाठी युरीया खताचे २१,५०० मेट्रिक टन वाटप मंजूर करण्यात आले आहे. त्यापैकी आतापर्यंत ९,८९० मेट्रिक टन खत जिल्ह्यात प्राप्त झाले असून जिल्ह्यात पुरेसा साठा उपलब्ध आहे. संयुक्त खतांसाठी २२,७०० मेट्रिक टन वाटप मंजूर असून त्यापैकी ५,८०१ मेट्रिक टन खत प्राप्त झाले आहे. सध्या ६,१४० मेट्रिक टन संयुक्त खताचा साठा उपलब्ध आहे. तसेच MOP खतासाठी ३०० मेट्रिक टन वाटप मंजूर असून त्यापैकी १४३ मेट्रिक टन खत प्राप्त झाले आहे. डिएपी खतासाठी ४,००० मेट्रिक टन वाटप मंजूर असून सध्या ५६१ मेट्रिक टन साठा उपलब्ध आहे.

डीएपी खताची मागणी लक्षात घेता, त्याचा तुटवडा भासू नये म्हणून कृषी विभागाकडून शेतकऱ्यांमध्ये पर्यायी खतांच्या वापराबाबत जनजागृती करण्यात येत आहे. तसेच मागणीनुसार खतांचा पुरवठा वाढविण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही सुरू आहे. शेतकऱ्यांना खतांची उपलब्धता सहजपणे समजावी यासाठी कृषी विभागाने विशेष ब्लॉगस्पॉट विकसित केला आहे. या माध्यमातून कृषी केंद्रनिहाय कोणते आणि किती खत उपलब्ध आहे, याची अद्ययावत माहिती शेतकऱ्यांना पाहता येते. दरम्यान, कोणत्याही खत विक्रेत्याकडून अनुदानित खताची किंवा इतर खतांची कमाल किरकोळ किंमत (MRP) पेक्षा जास्त दराने विक्री केली जात असल्यास संबंधित विक्रेत्याविरुद्ध तक्रार निवारण समितीकडे ८२७५६९०१६९ या मोबाईल क्रमांकावर तक्रार नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# नक्षलवाद्यांनी रोखलेल्या सर्व शासकीय योजना आता प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचवणे हेच उद्दिष्ट : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## गडचिरोलीतील २२ मिनी सेतू केंद्रांचे लोकार्पण ; दुर्गम भागात लोकाभिमुख डिजिटल प्रशासनाला नवी दिशा

**विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे**

मुंबई : गडचिरोली जिल्ह्यात नक्षलवादाचा प्रभाव मोठ्या प्रमाणात कमी झाल्यानंतर आता शासनाची प्राथमिकता दुर्गम भागातील प्रत्येक नागरिकापर्यंत शासकीय योजना आणि सेवा प्रभावीपणे पोहोचविण्याची आहे. अनेक वर्षे नक्षलवाद्यांमुळे रोखल्या गेलेल्या शासनाच्या सर्व योजना आता प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचवणे हेच राज्य शासनाचे उद्दिष्ट असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

गडचिरोली जिल्ह्यातील अतिदुर्गम व संवेदनशील भागातील नागरिकांना त्यांच्या गावातच विविध शासकीय सेवा उपलब्ध करून देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या २२ मिनी सेतू केंद्रांचे लोकार्पण मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते आज दूरदृश्य प्रणालीद्वारे करण्यात आले. या



कार्यक्रमाला मुंबई येथून राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल व अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. तर गडचिरोली येथून जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास गाडे आणि जिल्हा पोलीस अधीक्षक एम. रमेश उपस्थित होते. भामरागड व एटापल्ली तालुक्यातील मिनी सेतू केंद्रांचे चालक, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि संबंधित अधिकारीही दूरदृश्य प्रणालीद्वारे कार्यक्रमात सहभागी झाले. यावेळी मुख्यमंत्री म्हणाले की, प्रशासनाची उपस्थिती केवळ कार्यालयापुरती मर्यादित न राहता त्याचा लोकाभिमुख चेहरा नागरिकांना प्रत्यक्ष अनुभवता आला पाहिजे. शासनाच्या सेवा वेळेवर, पारदर्शक आणि सहज उपलब्ध झाल्यास लोकशाही व्यवस्था नागरिकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवू शकते. मिनी सेतू केंद्रांमुळे आदिवासी व दुर्गम भागातील नागरिकांना याची प्रचिती येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमादरम्यान मुख्यमंत्र्यांनी भामरागड येथील मिनी सेतू केंद्राशी संवाद साधून इंटरनेट सुविधा आणि सेवा वितरणाची माहिती जाणून घेतली. केंद्रावर इंटरनेट सुविधा सुरळीत सुरू असून रहिवासी दाखला, उत्पन्नाचा दाखला, आधार सेवा तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ नियमितपणे नागरिकांना दिला जात असल्याची माहिती केंद्र चालकांनी दिली. आरेवाडा ग्रामपंचायतीच्या महिला सरपंचांनीही मुख्यमंत्र्यांशी संवाद साधतांना मिनी सेतू केंद्र सुरू झाल्यानंतर गावातील नागरिकांना जन्म, रहिवासी, उत्पन्न यांसह विविध दाखले गावातच सहज उपलब्ध होत असल्याचे सांगितले. त्यामुळे तालुका मुख्यालयापर्यंत वारंवार जावे लागत नसून नागरिकांचा वेळ, पैसा आणि श्रम मोठ्या प्रमाणात वाचत असल्याचे त्यांनी नमूद केले. मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, राज्याचे मुख्य सचिव आणि पोलीस महासंचालक यांच्या गडचिरोली दौऱ्यादरम्यान या अभिनव उपक्रमाची संकल्पना मांडण्यात आली होती. पूर्वी नक्षलप्रभावित भागात महसूल व इतर शासकीय यंत्रणांना पोहोचणे अत्यंत कठीण होते. अशा परिस्थितीत पोलीस विभागाने पोलीस दादालोरा खिडकी या उपक्रमाच्या माध्यमातून दुर्गम भागातील नागरिकांपर्यंत शासनाच्या सेवा पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. त्याच संकल्पनेचा विस्तार म्हणून आता मिनी सेतू केंद्रांची उभारणी करण्यात आली आहे. गडचिरोली जिल्ह्यातील भौगोलिक दुर्गमता आणि डिजिटल दरी लक्षात घेऊन भामरागड व एटापल्ली तालुक्यात एकूण २२ मिनी सेतू केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. यामध्ये ९ आदी सेवा केंद्रे आणि १३ पोलीस दादालोरा खिडकी केंद्रांचे मिनी सेतू केंद्रांमध्ये रूपांतर करण्यात आले आहे. या केंद्रांमधून रहिवासी, जात, उत्पन्न, जन्म आदी दाखले, महाआयडी नोंदणी, आधार सेवा, बँकिंग सुविधा, विविध शासकीय योजनांचे अर्ज, पेन्शन सेवा आदी सुविधा नागरिकांना एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहेत. राज्य सेतू सोसायटीमार्फत प्रत्येक केंद्राला संगणक, प्रिंटर, स्कॅनर, फर्निचर तसेच इंटरनेट सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. याशिवाय प्रत्येक केंद्र चालकाला एक वर्षासाठी दरमहा ८ हजार रुपयांचे ऑपरेशनल सहाय्य दिले जाणार आहे. आरेवाडा, हेडरी, लाहेरी, टेकला, मल्लमपोडूर ग्रामपंचायत क्षेत्रांतील आदी सेवा केंद्रांसह धोडराज, वांगेतुरी, गर्देवाडा, कोठी आणि मन्नेराजाराम पोलीस ठाण्यांतील पोलीस दादालोरा खिडकी केंद्रांचे मिनी सेतू केंद्रांमध्ये रूपांतर करण्यात आले असून, उर्वरित आदी सेवा केंद्रे आणि पोलीस दादालोरा खिडकी केंद्रांद्वारेही दुर्गम भागातील नागरिकांना अधिक प्रभावीपणे शासकीय सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.